JAYDEEP B. KULKARNI
B.E. (Civil), MIE, FIV
Chartered Engineer & Approved Valuer
Office : Shop No. 1, Runanubandh Renuka, Prof. Colony Chowk, Savedi, Ahmednagar - 414003. | Mo. : 9822049099
Resi. : "Shubham", Suyog Grih Mandal, Neal Prof. Colony, Savedi, Ahmednagar - 414 003
Tel. : (0241) 2422459

RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR



गुलाबजाम, पेढे (फिके कंदी), बासुंदी, जिलेबी, मलाई बर्फी, बुंदी लाडू, समोसा, ढोकळा, कचोरी
महाराष्ट्रासह जिल्ह्यातील प्रसिद्ध मिठाई श्रेणीतील एक अग्रगण्य नाव
१०७ वर्ष
बन्सी महाराज मिठाईवाले
रामचंद्र खुंट, अहमदनगर.
Mo. 9860566509

Volume - 73 | Issue- 144 | Marathi Daily | Thursday 6/2/2025 | Pages - 6 | Price- Rs. 3

अग्रलेख: नव्या तंत्रक्रांतीच्या दिशेने... पान २



कर्करोग आजाराच्या जन जागृतीसाठी विद्यार्थ्यांचा संकल्प पान ५



आनंदऋषी हॉस्पिटलची आरोग्यसेवा कौतुकास्पद : कटारिया पान ६

## उठाठेव

– विवेक मेहेत्रे



उत्पन्नाच्या स्रोतापेक्षा कैंक पट अधिक बेनामी प्रॉपर्टी जमवल्याबद्दल तुम्हाला २ महिन्याची शिक्षा सुनावतोय..... बोला....रूग्णालय की तुरूंग? कोणता ऑप्शन निवडताय?

### लाडक्या बहिणीसह लोकप्रिय घोषणांचा सरकारी तिजोरीवर मोठा भार!

# सर्वसामान्यांच्या शिवभोजन, आनंदाचा शिधा योजनांना कात्री?

**मुंबई, दि.६–** चार महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्यातील भाजपा–शिवसेना–राष्ट्रवादीच्या महायुती सरकारने लाडक्या बहिणींसह लोकप्रिय घोषणा करीत त्यांची अंमलबजावणी केली. या योजनांचा विशेषतः लाडकी बहीण योजनेचा मोठा भार आर्थिक राज्य सरकारच्या तिजोरीवर पडला असून आगामी अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर राज्याची वित्तीय तूट भरून काढण्यासाठी आधीच्या शिवभोजन थाळी, आनंदाचा शिधा यासारख्या अनेक योजनांना कात्री लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

गतवर्षीच्या लोकसभा निवडणुकीतील धक्कादायक पराभवानंतर राज्यातील महायुती सरकारने रणनीती आखत लगेचच होणाऱ्या विधानसभा निवडणुकीची मोर्चेबांधणी केली. विधानसभा निवडणुकीत पुन्हा





महायुतीचेच सरकार सत्तेवर आले पाहिजे, यादृष्टीने लोकप्रिय घोषणा करीत त्याची अंमलबजावणी केली. विशेषतः राज्यातील महिला वर्गासाठी लाडकी बहिण योजना प्रभावीपणे राबविली. वार्षिक अडीच लाखांचे उत्पन्न असलेल्या महिलांना दरमहा १५०० रुपये देणारी लाडकी बहिण योजना राज्य सरकारसाठी अत्यंत महत्त्वाची ठरली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या योजनेच्या प्रसारासाठी राज्यभर मेळावे घेतले. महिला वर्गाचा प्रचंड प्रतिसाद लाभलेल्या या मेळाव्यांनी ऑक्टोबरच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठ्या बहुमताने निवडून दिले. लाडक्या बहिणींसह लोकप्रिय घोषणांमुळे महायुती सरकार अभूतपूर्व यश मिळवित पुन्हा सत्तेवर आले. आता लाडकी बहीण योजनेचा लाभ संबधित महिलांना निकषानुसारच मिळेल, असे सांगत सरकारने अर्जांची छाननी सुरू केली आहे. त्यामुळे निकषात न बसणाऱ्या लाडक्या बहिणींना या योजनेचा लाभ बंद होणार आहे. असे असले तरी प्रचंड लोकप्रिय ठरलेल्या लाडकी बहीण योजनेसाठी वर्षाला जवळपास ४६ हजार कोटी रुपये लागणार असल्याने त्याचा मोठा आर्थिक भार राज्याच्या तिजोरीवर पडला आहे. (पान ३ वर)

### ज्येष्ठ क्रिकेट समीक्षक

## द्वारकानाथ संझगिरी यांचे निधन



**मुंबई, दि.६–** ज्येष्ठ क्रिकेट समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांचे दीर्घ आजाराने निधन झाले आहे. द्वारकानाथ संझगिरी यांनी वयाच्या ७४ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. द्वारकानाथ संझगिरी यांच्यावर गेल्या काही दिवसांपासून मुंबईतील लीलावती रुग्णालयात उपचार सुरु होते. ते लवकरच या आजारातून कमबॅक करत घरी परततील, अशी आशा क्रिकेट चाहत्यांना होती. मात्र त्यांची प्राणज्योत माळवली. द्वारकानाथ संझगिरी यांच्या निधनानंतर सोशल मीडियावर अनेक क्रिकेट चाहत्यांकडून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला जात आहे.

द्वारकानाथ संझगिरी यांनी क्रिकेट आणि सिनेमा या विषयांवर अनेक पुस्तके लिहिली होती. क्रिकेट कॉकटेल, क्रिकेटर्स मनातले, अश्रू आणि षटकार, अफलातून अवलिये, फिल्मी कट्टा या आणि अशा अनेक पुस्तकांचे लेखन द्वारकानाथ संझगिरी यांनी केले होते. दरम्यान, द्वारकानाथ संझगिरी यांच्या पार्थिवावर शुक्रवारी ७ फेब्रुवारीला दुपारी १२ वाजता दादरमधील शिवाजी पार्क स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## निवडक

### धनंजय मुंडे यांना पोटगी द्यावी लागणार



**मुंबई, दि.६–** मंत्री धनंजय मुंडे यांच्या पत्नी करुणा मुंडे यांनी धनंजय मुंडे यांच्या विरोधात कौटुंबिक हिंसाचाराचा आरोप करत न्यायालयात धाव घेतली होती. त्यांचे आरोप आता वांद्रे येथील कौटुंबिक न्यायालयाने मान्य केले आहेत. एका वृत्तवाहिनीशी बोलताना करुणा मुंडे यांनी या वृत्ताला दुजोरा दिला. त्या म्हणाल्या, मी १५ लाख प्रति महिना पोटगी मिळावी म्हणून मागणी केली होती. मात्र न्यायालयाने दोन लाख पोटगी देण्याचा निर्णय घेतला आहे. पोटगी वाढवून मिळण्याबाबत उच्च न्यायालयात अपील करणार आहे. करुणा मुंडे पुढे म्हणाल्या की, मागच्या तीन वर्षांपासून मी खूप त्रास भोगला आहे. फक्त पोटगीसाठी मला खूप संघर्ष करावा लागला. पतीशिवाय एका महिलेचे जीवन जगणे खूप अवघड असते. आपला पती जेव्हा उच्च पदावर असतो, तेव्हा पूर्ण व्यवस्था त्याच्याबाजूने काम करत असते. तरीही मी ही लढाई लढली. माझ्या वकिलांनी प्रामाणिकपणे लढून मला न्याय मिळवून दिला.

### ... त्यांनी कुस्तीवर बोलू नये

## आ.संग्राम जगताप यांचे रोहित पवारांना प्रत्युत्तर

**समाचार/नगर-दि.६**

यंदाची ६७ वी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा मोठ्या थाटात संपन्न झाली. पृथ्वीराज मोहोळ यंदाचा महाराष्ट्र केसरी ठरला. मात्र, अंतिम सामन्यात पंचांकडून चुकीचा निर्णय झाल्याचे सांगत चांगलाच वाद झाल्याचे पाहिले. शिवराज राक्षेने पंचाला लाथ मारल्याने चांगलाच गोंधळ उडाला. आमदार रोहित पवार यांनी नव्याने कर्जत–जामखेड मतदारसंघात महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेचे आयोजन करावे, ही स्पर्धा शरद पवारांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात यावी, असेही म्हटले होते. तसेच, नगर येथील कुस्ती स्पर्धेत पैलवानांचा मान–सन्मान राखण्यात आला नसल्याचाही आरोप त्यांनी केला होता. आता, आमदार संग्राम जगताप यांनी रोहित पवारांवर पलटवार केला आहे. (पान ३ वर)

### डिसेंबरपर्यंत माहिती संकलित करणार; कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

## कुटुंबाच्या आरोग्य खर्चाचे होणार सर्वेक्षण

**समाचार/नगर-दि.६**

भारत सरकारच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या धर्तीवर कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च या विषयावर राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या सर्वेक्षणाकरीता घरी येणाऱ्या अधिकारी–कर्मचाऱ्यांकडून कुटुंब निवडीची प्रक्रिया, सर्वेक्षणाची महत्त्वाची माहिती समजून घेण्याचे आणि आरोग्यविषयक खर्चासंबंधी योग्य व परिपूर्ण माहिती देण्यासाठी सर्व संबंधित कुटुंबीयांनी पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन अर्थ व सांख्यिकी संचालनालयाने केले आहे.

पाहणीमध्ये जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत माहिती गोळा करण्यात येणार आहे. निवड झालेल्या कुटुंबांकडून मागील ३६५ दिवसांमध्ये कुटुंबाच्या आरोग्यविषयक होणाऱ्या खर्चाबाबत विस्तृत माहिती संकलित करण्यात येत आहे. या पाहणीचे निष्कर्ष आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा तसेच केंद्र व राज्य शासनाला नियोजनासाठी व धोरणे राबविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. नमुना तत्त्वावर निवडण्यात आलेल्या घटकातील कुटुंबाकडून प्राप्त माहितीवर आधारित निष्कर्ष हे राज्यातील लोकसंख्येकरिता अंदाजित केले जातील.

ही पाहणी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये होणार असून या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे शासकीय आणि खासगी रुग्णालयातून मिळणाऱ्या उपचारांवर होणारा खर्च, कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च, सर्व वयोगटातील लसीकरण, गर्भवती महिलांना मिळणाऱ्या सुविधांचा तपशील इत्यादी बाबींची माहिती गोळा करणे हा आहे. या सर्वेक्षणांतर्गत कुटुंबाची निवड एक वर्ष किंवा एक वर्षापेक्षा कमी वयाचे मूल असणारे कुटुंब आणि मागील ३६५ दिवसांमध्ये रुग्णालयामध्ये दाखल असणारी कुटुंबातील व्यक्ती यामधून करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणाच्या निष्कर्षांचा उपयोग आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा आणि सरकारच्या धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी होतो. राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवर प्रभावी निर्णय घेणे शक्य व्हावे, यासाठी सर्वेक्षणाच्या माहितीची सत्यता व गुणवत्ता अत्यंत महत्त्वाची आहे. माहिती संकलित करणाऱ्या अधिकारी–कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आले असून हे प्रशिक्षित कर्मचारी फेब्रुवारी ते डिसेंबर दरम्यान निवडलेल्या कुटुंबांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन विहित नमुन्यातील माहिती संकलित करणार आहेत.

### २ आरोपी जेरबंद, ६ गुन्हे उघडकीस

## सुपा, पारनेर, बेलवंडी, एमआयडीसीत दरोडयाचे गुन्हे करणारी टोळी निष्पन्न

**समाचार/नगर-दि.६**

सुपा, पारनेर, बेलवंडी व एमआयडीसी हद्दीत दरोडयाचे गुन्हे करणारी टोळी निष्पन्न करण्यात आली आहे. दरोडयाच्या टोळीतील २ आरोपींना मुद्देमालासह जेरबंद करण्यात आले आहे. स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली.

पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गर्शनाखाली सपोनि हेमंत थोरात, पोलीस अंमलदार फुरकान शेख, रविंद्र घुंगासे, भाऊसाहेब काळे, बाळासाहेब खेडकर, आकाश काळे, अमोल कोतकर, मेघराज कोल्हे, महादेव भांड यांच्या पथकाने ही कारवाई केली.



दि.२५ जानेवारी रोजी रात्री २ च्या सुमारास फिर्यादी योगेश खंडू शेरकर (वय ३०, रा.सोबलेवाडी, पठार वस्ती, ता.पारनेर) यांच्या राहत्या घरात अज्ञातांनी प्रवेश करून, फिर्यादी व त्यांचे आईस मारहाण केली. घरातील सोन्याचे दागीने, रोख रक्कम व मोटार सायकल जबरीने चोरून नेली. याबाबत पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा केलेले आरोपी मोटारसायकलवर कान्हुर रोडने पारनेरच्या दिशेने येत आहेत, अशी माहिती पथकाला मिळाली. पथकाने पारनेर ते कान्हुर पठार रोडवर सापळा लावून संशयीत इसमांना ताब्यात घेतले. त्यांनी त्यांचे नाव सिध्देश सादीश काळे (वय २२, रा.वाळुंज पारगाव, ता.नगर), श्रीहरी हरदास चव्हाण (वय २५, रा.वडगाव गुप्ता, ता.नगर), असे असल्याचे सांगितले. (पान ३ वर)

अहिल्यानगरमधील सुवर्णदालनासाठी
पाहिजेत
• अकौंटट जागा 4
• कॅशिअर जागा 4
• सेल्समन जागा 10
• सेल्सगर्ल जागा 10
• हेल्पर जागा 5
आकर्षक पगार आणि इन्सेन्टिव्ह । अनुभवीस प्राधान्य
इच्छुक उमेदवारांनी अर्जासह समक्ष भेटावे
A.H. पोखरणा ज्वेलर्स
साईदीप टॉवर, सर्जेपुरा, अ.नगर
सथ्था कॉलनी, स्टेशन रोड, अ.नगर

# परदेशी शिक्षणावरच्या कराचा बोजा कमी

**नवी दिल्ली, दि. ६–** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कर्ज घेऊन आपल्या मुलांना परदेशात पाठवणाऱ्या पालकांप्रती पूर्ण औदार्य दाखवले आहे. कर्ज घेऊन परदेशात शिकणाऱ्या मुलांच्या महाविद्यालयीन फी भरण्यावर 'टीसीएस' म्हणजेच स्त्रोतावरील कर कपात रद्द केली आहे. याआधी एका वर्षात कॉलेज फीसाठी ७ लाखांपेक्षा जास्त रक्कम पाठवण्यावर ०.५ टक्के कर आकारला जात होता. कर्ज न घेता परदेशात पैसे पाठवल्यास 'टीसीएस' २० टक्के कपात करत राहील. ज्यांनी आपल्या मुलांना परदेशात शिकविण्यासाठी कर्ज घेतले आहे, त्यांना दिलासा मिळाला आहे; पण ज्यांनी आयुष्यभराची बचत किंवा मालमत्ता किंवा दागिने विकून आपल्या मुलांना परदेशात पाठवले आहे, त्यांना दिलासा मिळालेला नाही.

**फी साठी मदतीची योजना**



कॉलेजच्या फीसाठी परदेशात पैसे पाठवल्यास २० टक्के 'टीसीएस' कापले जातील; मात्र कर्ज न घेता परदेशी कॉलेजांमध्ये फी भरण्याची 'टीसीएस'ची मर्यादा वाढवण्यात आली आहे. सरकारने आता त्याची मर्यादा ७ लाख रुपयांवरून १० लाख रुपये केली आहे. अशा पालकांनाही उत्पन्नाचा विचार करून दिलासा मिळायला हवा, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. कारण यातील अनेक पालक असे आहेत, की जे व्याजाचा बोजा पडू नये, म्हणून कर्ज घेत नाहीत आणि पीएफ वगैरेची रक्कम काढल्यानंतरही ते आपल्या मुलांच्या भविष्यासाठी स्वतःच्या भवितव्याचा त्याग करतात. अशा पालकांची परिस्थिती कर्ज काढून मुलांना परदेशात पाठवणाऱ्या पालकांपेक्षाही वाईट होते.

**मध्यमवर्गीय पालकांची स्वप्ने होतील पूर्ण**

अर्थमंत्र्यांचे हे पाऊल विदेशात उच्च शिक्षणाला चालना देऊन विकसित भारताच्या इराद्याला पुष्टी देणारे आहे. यामुळे मध्यमवर्गीय पालकांची स्वप्नेही पूर्ण होतील. ज्यांना आपल्या मुलांना शिक्षणासाठी परदेशात पाठवून त्यांचे चांगले भविष्य सुनिश्चित करायचे आहे, अशी स्वप्ने पाहणाऱ्या पालकांची संख्याही वाढेल.

### ७० हजाराचे सोन्या-चांदीचे दागिने चोरीस

## लग्नासाठी पाथर्डी येथे गेलेल्या कुटुंबाचे घर फोडले

**समाचार/नगर-दि.६**

घर बंद करून पाथर्डी येथे नातेवाईकांच्या लग्नासाठी जाणे एका कुटुंबाला चांगलेच महागात पडले. त्यांचे घर चोरट्यांनी फोडून सुमारे ७० हजार रूपये किमतीचे सोन्या– चांदीचे दागिने लंपास केले आहेत. सावेडी उपनगरातील गावडे मळा, कादंबरी नगर येथे सोमवारी सकाळी १० ते मंगळवारी सकाळी १०:१५ वाजताच्या दरम्यान ही घटना घडली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहदेव भगवान पवार (वय ३८) यांनी फिर्याद दिली आहे. शहदेव हे सोमवारी कुटुंबासह एका नातेवाईकाच्या लग्नासाठी पाथर्डी येथे गेले होते. सकाळी १० वाजता त्यांनी घराला कुलूप लावले होते. दुसऱ्या दिवशी मंगळवारी सकाळी १०:१५ वाजता परत आल्यानंतर त्यांना घराचे कुलूप तुटलेले आढळले. चोरट्यांनी घरातील बेडरूममधील कपाट उचकून २७ ग्रॅमचे सोन्याचे पट्टी गंठण, पाच ग्रॅमचे सोन्याचे मिनी गंठण, सोन्याचे चार जोड मणी पळ्या, सोन्याच्या चार रिंगा, गळ्यातील दागिना, नाकातील सोन्याची नथ, नाकातील सोन्याची मुरणी, सोन्याच्या दोन छोट्या पळ्या, कानातील सोन्याची एक रिंग, चांदीचे सात जोड जोडवे, चांदीचे पट्टे, चांदीच्या दोन कंबरसाखळ्या चोरून नेल्या. या प्रकारानंतर शहदेव यांनी तातडीने पोलिसांना कळवले. पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

IMS AHMEDNAGAR
ATTENTION
BBA/ BCA ASPIRANTS
CET IS COMPULSORY FOR BBA / BCA ADMISSION
LAST DATE TO FILL CET FORM
10th Feb, 2025
NO ADMISSION TO BBA/BCA WITHOUT CET
For More Details
M. 98231 00756 / 98900 70077
B.P.H.E. Society's
INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES CAREER DEVELOPMENT AND RESEARCH
IMS Campus, Station Road, Ahilyanagar - 414 001.
NAAC Accredited Institute
Best Institute Award by SP Pune University
Website : www.imscdr.ac.in

संपादकीय

# नव्या तंत्रक्रांतीच्या दिशेने...

एका तासात होणारे काम आज 'एआय'च्या मदतीने अवघ्या पाच मिनिटांमध्ये होत आहे. 'चॅट जीपीटी', 'मेटा एआय' हे 'एआय' जगतातील अग्रणी मानले जातात; मात्र या सर्वांची झोप उडवणारी 'एआय' यंत्रणा चीनने आणली आहे. चीनने या यंत्रणेला 'डीपसीक' असे नाव दिले आहे. विशेष म्हणजे हे तंत्रज्ञान येताच आता 'चॅट जीपीटी'सारख्या 'एआय' यंत्रणांची झोप उडाली आहे. चीनचे हे नवीन कृत्रिम बुद्धिमत्तेचे मॉडेल अमेरिकेत सध्या आघाडीवर असलेल्या चॅट जीपीटीइतके चांगले असल्याचे 'डीपसीक'ने म्हटले आहे. शिवाय, ते विकसित करण्यासाठी लागणारा खर्चही तुलनेने फार कमी असल्याचा दावा करण्यात आला आहे. प्रतिस्पर्धी कंपन्या या प्रकारचे ॲप, मॉडेल्स विकसित करण्यासाठी अब्जावधी डॉलर्सचा खर्च करतात; पण 'डीपसीक ॲप' ६० लाख डॉलर्सपेक्षाही कमी रकमेत विकसित करण्यात आले असल्याचा दावा या ॲपच्या संशोधकांनी केला आहे. 'डीपसीक' या चीनी कृत्रिम बुद्धिमत्ता कंपनीची स्थापना चीनमधल्या हांगझाऊ या आग्नेय भागातील शहरात झाली. कंपनी २०२३ मध्ये स्थापन झाली असली, तरी त्यांचे लोकप्रिय ॲप अमेरिकेत दहा जानेवारी २०२५ ला लाँच झाले. 'डीपसीक'ला भांडवली मदत करण्यासाठी लिआंग वेनफेंग यांनी हेज या फंडाचीही स्थापना केली. त्यातून आलेल्या निधीतून ते 'डीपसीक'चा अर्धा खर्च भागवू शकले. वेनफेंग ४० वर्षांचे असून माहिती आणि इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर आहेत. त्यांनी 'एनव्हिडिया ए १००' या अमेरिकन कंपनीच्या चिपचे एक स्टोअर उभारले होते. 'एनव्हिडिया'च्या चीपची चीनला निर्यात करण्यावर आता बंदी आहे. तज्ज्ञांच्या मते, वेनफेंग यांच्याकडे जवळपास पन्नास हजार चीप संग्रही होत्या. त्यामुळेच त्यांना 'डीपसीक' लाँच करता आली. स्वस्त आणि कमी दर्जाच्या चीप्सबरोबर जोडलेल्या या चीप्स अजूनही आयातीसाठी उपलब्ध आहेत. अलीकडेच 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'च्या क्षेत्रातील तज्ज्ञ आणि चीनचे पंतप्रधान ली किआंग यांच्यातील बैठकीत लिआंग दिसले होते. 'डीपसीक'हे ॲप 'ॲपल स्टोअर'वर आणि कंपनीच्या वेबसाईटवर ऑनलाईन डाऊनलोडसाठी उपलब्ध आहे. ॲपची सेवा मोफत वापरता येत असल्याने अल्पावधीतच ॲपल स्टोअरच्या सर्वाधिक डाऊनलोड केल्या जाणाऱ्या ॲप्सच्या यादीत त्याने जागा मिळवली. सर्वाधिक रेटिंग मिळालेले मोफत ॲप म्हणूनही या ॲपला अमेरिकेत मान्यता मिळत आहे. 'चॅट जीपीटी'प्रमाणेच 'डीपसीक'मध्येही कृत्रिम बुद्धिमत्तेची मदत घेता येते. 'डीपसीक'च्या कमी खर्चाच्या दाव्याने आर्थिक बाजारात २७ जानेवारीला फार मोठी ढवळाढवळ केली. या घटनेमुळे नॅसडॅक कंपोझिट निर्देशांक तीन टक्क्यांनी खाली आला. त्याचा प्रभाव जगभरातील चीप मार्केट आणि डेटाचे व्यवस्थापन करणाऱ्या कंपन्यांनाही सोसावा लागला. याचा सर्वाधिक फटका 'एनव्हिडिया' या अमेरिकास्थित सेमीकंडक्टर चिप बनवणाऱ्या कंपनीला बसला. कंपनीचे एकाच दिवसात ६०० अब्ज डॉलर्सचे नुकसान झाले. अमेरिकेच्या इतिहासात कोणत्याही कंपनीला एका दिवसात सोसावे लागलेले हे सर्वाधिक नुकसान आहे. 'एनव्हिडिया'ने तयार केलेल्या सेमीकंडक्टर चीप्सपेक्षा कमी गुणवत्तेच्या चीप्स 'डीपसीक'मध्ये वापरल्या जातात. मोठी गुंतवणूक आणि सर्वोत्तम दर्जाचा माल वापरूनच कृत्रिम बुद्धिमत्तेवर ताबा मिळवता येऊ शकतो, या समजुतीला 'डीपसीक'च्या यशामुळे तडा बसला. विशेष म्हणजे चीनी कंपनीने विकसित केलेले हे 'डीपसीक एआय' मोबाईल तसेच लॅपटॉपवरही वापरता येणार आहे. या 'एआय' तंत्रज्ञानाचा परवाना 'मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' या संस्थेकडे आहे. कुठल्याही अडचणींवर उत्तर शोधण्यासाठी हा एक खुला आणि मोफत असा मंच आहे. यावर वैयक्तिक तसेच कार्यालयीन समस्यांवर उत्तरे शोधता येतात. अमेरिकेने चीप पुरवण्यास बंदी घातल्यानंतर 'डीपसीक'ने सध्या लाँच करण्यात आलेले 'एआय मॉडेल' हे 'एनव्हिडिया' कंपनीच्या कमी कार्यक्षमता असलेल्या एच८०० चीपच्या मदतीने विकसित करण्यात आल्याचा कंपनीचा दावा ही अमेरिकेला एक प्रकारची चपराक आहे. 'डीपसीक एआय असिस्टंट'ने डाऊनलोडिंगच्या बाबतीत 'ओपन एआय'च्या 'चॅट जीपीटी'ला मागे टाकले आहे. 'डीपसीक' कोणकोणत्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकते, हे अद्याप नीट समजलेले नाही. 'डीपसीक' या चॅटबॉटमुळे अमेरिकन शेअर मार्केटमध्येही हाहाकार उडाला. अनेक टेक कंपन्यांचे शेअर्स गडगडले. भारतातही त्याचा परिणाम झाला. 'डीपसीक' या चॅटबॉटमुळे भारतीय शेअर बाजारात सूचिबद्ध झालेल्या काही टेक कंपन्यांचे शेअर्स गेल्या दोन ते तीन सत्रांमध्ये साधारण ५० टक्क्यांपर्यंत घसरले. म्हणजेच काही कंपन्यांच्या शेअर्सचे मूल्य हे साधारण ५० टक्यांपर्यंत खाली आले. घसरण झालेल्या कंपन्यांमध्ये अनंत राज, 'नेटवेब टेक्नॉलॉजीज इंडिया', 'झेन टेक्नॉलॉजीज' यांच्यासह इतरही काही कंपन्यांचा समावेश आहे. 'अनंत राज लिमिटेड' या कंपनीचे शेअर्स वीस टक्क्यांनी घसरले. या कंपनीला लोअर सर्किट लागले. 'नेटवेब टेक्नॉलॉजीज इंडिया लिमिटेड' या कंपनीच्या शेअरचे मूल्यदेखील दहा टक्क्यांनी कमी होऊन १,४६०.३५ रुपयांवर बंद झाले. 'डीपसीक' आपले मॉडेल विकसित करण्यासाठी मोठ्या गुंतवणुकीवर आणि 'टॉप–ऑफ–द–लाइन चीप्स'वर अवलंबून राहिले नाही. याचे मुख्य कारण म्हणजे चीनी कंपन्यांकडे शक्तिशाली 'जीपीयू' किंवा 'ग्राफिक्स प्रोसेसिंग युनिटस्'पर्यंत मर्यादित प्रवेश आहे. अनेक पाश्चात्य कंपन्या त्यांच्यावर विसंबून राहतात. कारण अमेरिकेचे सरकार अत्यंत प्रगत चीप्सवर कठोर निर्यात नियंत्रणे लादते. त्याला आता 'डीपसीक' हा चांगला पर्याय आहे. चांगल्या कामासाठी हे तंत्रज्ञान वापरले, तर कुणाचा विरोध असणार नाही; परंतु चीनचा भर अमेरिकेला धडा शिकवण्यावर असल्याने त्यातून चांगले काही निष्पन्न होण्याची शक्यता नाही

# मूकबधिर विद्यालयातील दहा विद्यार्थ्यांचे नेत्रदीपक यश



**समाचार/नगर-दि.६**

नगर–जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र व जिल्हा समाज कल्याण विभाग व समग्र शिक्षा समावेशित शिक्षण विभाग, यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शालेय क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये जिल्हाभरातील सर्व मूकबधिर विद्यालयांनी सहभाग नोंदवला. यामध्ये सावेडी येथील अपंग संजीवनी सोसायटी संचलित मूकबधिर विद्यालय व वस्तीगृहातील विद्यार्थ्यांनी दैदीप्यमान यश संपादन करत दहा सुवर्ण पदक, चार रौप्य पदक, दोन कांस्यपदकासह सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये समूहगीताला तृतीय क्रमांक मिळाला आहे.

मयूर त्रिभुवन, अनुष्का राहींज, श्रावणी पालवे, सचिन लोंढे, अक्षदा गायकवाड, संग्राम साबळे.

धावणे– श्रीनाथ मदने, दीपाली तिवारी, नितीन लांडगे, कावेरी साबळे. श्रावणी पालवे, भक्ती वारंगुळे, अनिरुध्द जाधव या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

# डॉ. अमोल फडके यांची जिल्हा काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी निवड




**समाचार/नगर-दि.६**

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी डॉ. अमोल फडके यांची नगर जिल्हा काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी निवड केली आहे.

थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष जयंत वाघ यांनी डॉ. फडके यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. संगमनेर येथे झालेल्या एका विशेष कार्यक्रमात माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते त्यांना अधिकृत निवडपत्र प्रदान करण्यात आले. डॉ. अमोल फडके यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात युवक काँग्रेसमधून केली. तालुका युवक काँग्रेस अध्यक्ष, तालुका काँग्रेस अध्यक्ष, जिल्हा काँग्रेस सरचिटणीस अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडत त्यांनी संघटन कौशल्याची चमक दाखवली आहे. विशेषतः युवकांना संधी देऊन पक्षाच्या नव्या पिढीला सक्षम करण्यासाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. पक्ष संघटनेच्या बळकटी साठी आणि काँग्रेसच्या विचारधारेचा प्रसार करण्यासाठी आपण कटिबध्द असल्याचे त्यांनी सांगितले.

# चर्चा 'डीपसीक'ची




चीनच्या नवीन स्टार्टअप कंपनीने नुकतेच बाजारात कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित 'डीपसीक आर१' हे प आणले. संपूर्ण जगात याने धुमाकूळ घातला आहे. या घोषणेबरोबरच जगातील विशेषतः अमेरिकेतील तंत्रज्ञान क्षेत्रातील कार्यरत कंपन्यांचे शेअर्स मोठ्या प्रमाणावर घसरले आहेत. त्यांची किंमत कमी झाली आहे. काय आहे हो 'डीपसीक'.

याच्या आधी कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रामध्ये अमेरिकेच्या 'चॅट– जीपिटी', 'जेमिनी', ग्रोक या प्सचा दबदबा होता. हे प्स बनवण्याकरता अमेरिकन कंपन्यांनी व सरकारने मोठ्या प्रमाणावर पैसा लावला होता. आता मात्र या प्सच्या तुलनेने तेवढेच प्रभावी प चीनने बनवले आहे व तेही अत्यंत कमी खर्चामध्ये.

**विज्ञान भारती**

यामुळेच आता या अमेरिकन टेक कंपन्यांचे धाबे दणाणले आहेत. आज पल स्टोअर वर डीपसीक हा प डाऊनलोड करण्यामध्ये अव्वल स्थानी आहे, हि गोष्टच आपल्याला सर्व काही सांगून जाते.

टेसला, मेटा, अल्फाबेट या दिग्गज अमेरिकन कंपन्यांना या बातमीने धक्का दिला आहे. चिनी स्टार्टअप कंपनीने स्वस्त व कमी चीपचा वापर करून त्याचप्रमाणे अत्यंत कमी ऊर्जेचा वापर करून हे तंत्रज्ञान आत्मसात केले आहे.


या तंत्रज्ञानाचे जनक डीपसीकचे संस्थापक लियांग वेनफेंग यांनी म्हटले आहे हा प आम्ही फक्त साठ लाख डॉलर्स मध्ये तयार केला आहे. तुलनेने अमेरिकन कंपन्यांना चॅट जीपीटी विकसित करण्यासाठी प्रचंड मोठ्या प्रमाणावर डॉलर्स लागले होते. यामुळे तर अमेरिकन प्रशासन व कंपन्या अत्यंत चिंताग्रस्त दिसत आहेत. त्यांना वाटत होते हे अत्याधुनिक तंत्रज्ञान आपल्या शिवाय कोणालाही विकसित करता येणार नाही. हे विकसित करता येऊ नये म्हणून त्यांनी जी अमेरिकेची चीप बनवणारी कंपनी ,'निवेडीया' हिला सुद्धा हे चीप चायनाला निर्यात करण्यावर बंदी घातली होती. शेवटी अनेक अडथळ्यांची शर्यत पार करत चीनने एक स्वस्त असे कृत्रिम बुद्धिमत्तेचे प तयार केले.

आता आपल्या भारतानेही यासंदर्भात आपली कंबर कसली आहे. केंद्रीय माहिती तंत्रज्ञान व इलेक्ट्रॉनिक मंत्री अश्विनी वैष्णव यांनी भारताचे स्वदेशी 'ए आय' मॉडेल लवकरच उपलब्ध होईल असे जाहीर केले आहे. त्या संदर्भात अनुदान व विविध सहाय्ये सुद्धा जाहीर केलेली आहेत. भारत सरकारने आपल्या 'ए आय' मिशनला मंजूर दिली आहे. भारताकडे आज पंधरा हजाराहून अधिक दर्जेदार अश्या 'जीपीयुं' चा समावेश आहे. 'डीपसीक' चे मॉडेल हे फक्त दोन हजार जीपीयुंनी बनलेले होते. आता आपल्या लक्षात येईल की भारताकडे सुद्धा जवळपास ती क्षमता आहे. जीपीयू अर्थातच ग्राफिक प्रोसेसिंग युनिट हे कम्प्युटर मधले एक इलेक्ट्रॉनिक सर्किट आहे. ते संगणकात सर्व प्रकाराच्या व्हिडिओ व ग्राफिक प्रक्रिया पार पाडते व त्यामुळे ते आधुनिक संगणकाचे प्रमुख घटक बनलेले आहेत.

'डीपसीक'ने घडवलेल्या बदलाचे एक सुंदर व्यंगचित्र नुकतेच एका वृत्तपत्रामध्ये आले होते. त्यात त्यांनी दाखवले होते की 'डीपसीक' व चॅट–जीपीटी हे दोघेही मासेमारी करत आहेत, पण 'डीपसीक'च्या जाळीलाच मासे चिकटलेले आहेत. व्यंगचित्र सद्य परिस्थिती स्पष्ट सांगत आहे. भारत सरकारनेही आपल्या बजेटमध्ये देशात तीन 'ए आय' एक्सलन्स सेंटर उभारण्याचे जाहीर केलेले आहे. महाराष्ट्र सरकारने नुकतेच पहिले 'ए आय' विद्यापीठ महाराष्ट्रात उभारण्याचे जाहीर केलेले आहे. थोडक्यात आपले सरकार सुद्धा आपल्या तरुणांना या महत्त्वाच्या तंत्रज्ञान कौशल्याने सुसज्ज करण्यास तयार आहेत. आशा करूया लवकरच आपला भारत स्वतःचे 'ए आय'मॉडेल तयार करेल.

**– डॉ.दत्ता पोंदे**

मोबाईल– ७३८७९००७००




## राशीभविष्य

- **मेष** : गैरसमजातून वाद–विवाद संभवतात. माता–पित्याची चिंता राहील. नोकरीत सन्मानाचे योग आहेत.
- **वृषभ** : व्यवसायात मोठी प्राप्ती होईल. नोकरीच्या प्रयत्नात यश येईल. सार्वजनिक क्षेत्रात विचारानं रहावं.
- **मिथुन** : पूर्वीच्या गुंतवणुकीचे उचित लाभ घेता येतील. कायदेशीर बाबतीत काळजी घ्यावी. प्रकृती सांभाळा.
- **कर्क** : डोळ्यांचे विकार संभवतात. वाहनात बिघाड त्रासदायक ठरेल. व्यवसायातील प्राप्तीत वाढ होईल.
- **सिंह** : आर्थिक फसवणूक संभवते. कौटुंबिक कलह वेळीच दूर करावे. व्यवसायात अडचणी येतील.
- **कन्या** : भाग्योदयाचा कालावधी आहे. प्रकृतीच्या तक्रारी दूर होतील. स्थावर, वाहन सौख्य लाभणार आहे.
- **तूळ** : विवाहाच्या प्रयत्नांना यश लाभेल. लहान मुलांबाबत चिंता राहील. सरकारी कामं मनाजोगी होतील.
- **वृश्चिक** : उत्कर्षाच्या संधी लाभतील. मुलाखतीत यश लाभेल. व्यावसायिक कर्जाला चालना मिळेल.
- **धनु** : कामाचा वेग वाढेल. कौटुंबिक सौख्य लाभणार आहे. बँकांची कामं मार्गी लागणार आहेत.
- **मकर** : अचानक धनलाभाचे योग आहेत. खेळाडू, कलावंतांना उत्तम लाभ होईल. पतप्रतिष्ठा वाढणार आहे.
- **कुंभ** : व्यवसायात मोठी गुंतवणूक होईल. आतापर्यंतचे प्रयत्न फलद्रुप होतील. कोर्ट प्रकरणं मार्गी लागतील.
- **मीन** : व्यवसायात नव्या संधी लाभतील. छोटा–मोठा प्रवास घडेल. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.

## ७ फेब्रुवारी

दिनविशेष

**१९३७** : १९१२ चं नोबेल मिळवणारे अमेरिकी मुत्सदी एलिहू रूट यांचं निधन.
**१९९२** : भारतामध्ये तयार झालेली शक्ली ही पहिली पाणबुडी नौदलात दाखल.
**२०१३** : 'व्हीआयपीं' ऐवजी महिलांना सुरक्षा द्या, सर्वोच्च न्यायालयाचे बोल.
**२०१४** : ज्येष्ठ उद्योगपती आणि आरबीजी समुहाचे अध्यक्ष रमेश भालचंद्र गरवारे यांचं निधन.
**२०१६** : मुंबईतील २६/११ हल्ल्यातील आरोपी डेव्हिड हेडलीची व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उच्च न्यायालयात साक्ष.

आरोग्यमंत्र

## गिळताना त्रास होतोय?

आरोग्यविषयक काही समस्या सर्वसाधारण मानल्या जातात. याच कारणांमुळे त्यांच्याकडे दुर्लक्ष होण्याचीही शक्यता असते. गिळताना त्रास होणं ही अशीच सर्वसाधारण समस्या असली तरी ते जंतूसंसर्ग किंवा ॲलर्जीचं लक्षण असू शकतं. गिळताना तीव्र स्वरूपाच्या वेदना होत असतील किंवा खाताना, पिताना, श्वास घेताना अडथळे येत असतील तर तातडीने डॉक्टरांचा सल्ल्ला घ्यायला हवा. सर्दी, फ्लू, जुनाट कफ, घशाचा जंतूसंसर्ग, टॉन्सिल्स ही यामागची सर्वसाधारण कारणं असू शकतात. मानेजवळ आलेली सूज, घशाला दुखापत होणं, कानांचा जंतूसंसर्ग, मोठ्या आकाराच्या गोळ्या घेणं, वेफर्स किंवा इतर पदार्थ चुकीच्या पद्धतीने गिळणं यामुळे काही काळासाठी गिळायला त्रास होऊ शकतो.

गिळताना वेदना होत असतील तर काही गुंतागुंतीच्या समस्या निर्माण होऊ शकतात. त्यात छातीचा जंतूसंसर्ग, बॅक्टेरिया किंवा विषाणूमुळे झालेल्या जंतूसंसर्गाने गंभीर स्वरूप धारण करणं, तोंडाची चव जाणं, मानेला सूज आल्याने डोक्याच्या हालचालींवर मर्यादा येणं, गिळताना वेदना होण्यासोबत जंतूसंसर्ग झाला तर ताप, थंडी, डोकेदुखी, कोरडा खोकला, घाम येणं, टॉन्सिल्स लाल होणं अशी लक्षणं दिसू शकतात. लहान मुलांना गिळताना तसंच श्वास घ्यायला त्रास होणं, घशाला सूज अशी लक्षणं दिसली तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. प्रौढांमध्ये तोंड उघडायला त्रास होणं, गिळायला त्रास होणं, घशात तीव्र स्वरूपाच्या वेदना, श्वास घ्यायला त्रास ही लक्षणं असतील तर डॉक्टरांकडे जायला हवं.



महत्त्वपूर्ण काही...

## आता स्मार्ट इन्शुलिन

आपल्या देशात मधुमेहींचं वाढतं प्रमाण ही मोठी चिंताजनक बाब ठरत आहे. या संदर्भात सातत्यानं संशोधन सुरू आहे. टाईप वन मधुमेहींच्या शरीरात इन्शुलिन नैसर्गिकरित्या तयार होत नाही किंवा त्यांचं शरीर नैसर्गिकरित्या तयार झालेल्या इन्शुलिनचा वापर करू शकत नाही. त्यामुळे त्यांना इन्शुलिनच्या इंजेक्शनवर अवलंबून राहावं लागतं. अशा रूग्णांचा त्रास कमी करण्यासाठी 'मॅसाच्युसेट्स इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नोलॉजी'च्या संशोधकांनी प्रयोगशाळेत स्मार्ट इन्शुलिनचा शोध लावला. नेहमीच्या इन्शुलिनवर रासायनिक प्रक्रिया करून हे स्मार्ट इन्शुलिन तयार करण्यात आलं. हे आठवड्यातून एकदा घेतलं तरीही टाईप वन मधुमेहींच्या रक्तातल्या साखरेचं प्रमाण नियंत्रणात राहण्यात मदत होईल, अशी शास्त्रज्ञांना आशा आहे. रक्तातली साखरेची पातळी वाढली की स्मार्ट इन्शुलिन सुरू होईल आणि ती नियंत्रणात आली की ते बंद होईल अशा प्रकारे याची रचना करण्यात आली आहे. टाईप वन मधुमेहींच्या दृष्टीने हा महत्त्वाचा शोध अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

सल्ला मोलाचा

## बॅकलेस कपडे वापरताय?

सध्या बॅकलेस अथवा डिप नेकवाल्या ब्लाऊजची फॅशन आहे. हे पेहराव हटके लूक देऊन जातात. नियमितपणे स्क्रबिंग केल्यास पाठीच्या त्वचेची डेड स्किन निघून आकर्षकता वाढण्यास मदत होते. * लेमन स्क्रब – हा स्क्रब तयार करण्यासाठी सॉल्ट क्रिस्टल लिंबाच्या रसात मिसळा. त्यात ऑलिव्ह ऑईलचे काही थेंब टाका. आता हलक्या हातानं हा स्क्रब पाठीवर चोळा. यामुळे पाठीवरची सगळी धूळ आणि डेड स्कीनचा लेअर निघून जाईल. * कॉफी स्क्रब – मूठभर कॉफीच्या बिया आणि ब्राऊन शुगर एकत्र बारीक करून घ्या. लावण्याआधी यात एक चमचा मध आणि एक चमचा ऑलिव्ह ऑईल मिसळा. या स्क्रबनं पाठ स्वच्छ करा. * ऑरेंज आणि शुगर स्क्रब – गुलाबाच्या पाकळ्या, संत्र्याच्या सुकलेल्या साली आणि साखर एकत्र बारीक करून घ्या. वापरण्याच्या आधी या मिश्रणात मध आणि ऑलिव्ह ऑईल मिसळा. पाठीच्या त्वचेसाठी हा उत्तम स्क्रब आहे. * कॉफी आणि अल्मड स्क्रब – एक कप कॉफी, एक चमचा मीठ आणि एक चमचा दालचिनी पावडर एकत्र करा. वापरण्याआधी त्यात बदाम तेलाचे काही थेंब मिसळा. यात अन्य औषधी तेलांचा वापरही करता येईल. हे मिश्रणही पाठीसाठी उत्तम स्क्रबचं काम करतं.

## पंचांग

**शुक्रवार, ७ फेब्रुवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
माघ शु. १०, नक्षत्र : रोहिणी
चंद्रराशी : वृषभ, ऐंद्र योग,
सूर्योदय : ७.१०, सूर्यास्त : ६.३४

## फॉरवर्डस

कधी कधी केवळ आठवणींची सोबतही महत्त्वाची ठरते.

**रख लो दिलमें**
**संभालकर थोडी सी यादे हमारी,**
**रह जाओगे जब तन्हा...**
**बहुत काम आयेंगे हम!**


वाचा तर खरं

हील्स आणि टाय या ॲक्सेसरीज व्यक्तिमत्त्वाला डौल देणाऱ्या आहात. याच्या शोधाच्या कथाही रंजक आहेत. पूर्वी इराणी सैन्य घोड्यांवरुन युद्धभूमीवर जात असे. तेव्हा कमी उंचीमुळे काही समस्या उद्भवत असत. तेव्हा १७०१ मध्ये उंच टाचेच्या बुटांचा शोध लागला. कालांतराने अशी पादत्राणे महिलांमध्ये लोकप्रिय झाली. टाय अथवा बो ची सुरूवातदेखील सैनिकांनीच १६६० मध्ये केली. फ्रान्समधील सैनिकांनी टाय बांधण्यास सुरूवात केली. नंतर तेथील श्रीमंत लोकांनीही त्याचा अवलंब सुरू केला. आहे ना रंजक कथा?

## स्ट्रेचिंगविषयी जाणून घ्या

फिटनेस फंडा

दोस्तांनो, आजकाल वाढतं प्रदूषण, वाहतुकीची समस्या तसंच अन्य काही कारणांमुळे पुन्हा सायकलचा वापर वाढीस लागला आहे. व्यायामाच्या दृष्टीनेही सायकलिंग महत्त्वाचं ठरतं. विशेषत: वजन कमी करण्यासोबतच हृदय आणि मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही सायकलिंगचे बरेच लाभ आहेत. पण सतत पॅडल मारत राहिल्यामुळे तसंच बराच काळ एकाच स्थितीत बसून राहिल्यामुळे पाय आणि मानेवर प्रचंड ताण येतो. स्नायू दुखायला लागतात. मात्र स्ट्रेचिंगद्वारे हा त्रास कमी करता येतो. नियमित सायकलिंग करणाऱ्यांनी शरीर ताणणारे व्यायाम करायला हवेत त्याविषयी माहिती घेऊ...



* स्वॅड स्ट्रेचसाठी सरळ उभे रहा. दोन्ही पाय पसरवा. उजवा पय वर न्या आणि उजव्या हातांनी टाच धरा. टाचेला धरून पाय ओढा. पायाच्या पुढच्या बाजूला ताण जाणवायला हवा. अशाच पद्धतीने डावा पाय ताणण्याचा व्यायाम करा.

* हॅमस्ट्रिंग यात स्नायूला ताण द्यायला हवा. यासाठी पाय समोरच्या एखाद्या सपाट पृष्ठभागावर ठेवा. यासाठी स्टूल, टेबल किंवा भिंतीचा आधार घेता येईल. पाय सरळ करा. अंगठा आणि बोटं वरच्या बाजूला ताणली जावी. आता थोडं पुढे वळून घोट्याच्या भागावर हाताने दाबा.

* सतत सरळ बघितल्यामुळे मानेवर ताण येतो. यासाठी मानही ताणावी. चेहरा उजव्या आणि डाव्या बाजूला नेऊन मानेवर थोडा ताण द्या. यामुळे मानेला आराम मिळेल.

खेचाखेची

## काय करशील?

**पत्नी:** (लाडात येऊन) जानू, समजा मी उद्या हरवले तर तू बेचैन होशील ना? सांग ना, काय करशील तू?
**पती:** (गंभीर होत) मी दुसरं तिसरं काहीही न करता तडक आपल्या महाराजांकडे जाईन.
**पत्नी:** आणि त्यांना काय सांगशील?
**पती:** म्हणेन, पुन्हा एकदा तुमचा कृपाप्रसाद मिळू लागला आहे.


वेगळे काही

कोणत्याही ठिकाणी एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्याचे नातेवाईक दु:ख व्यक्त करतात. पण, जगामध्ये काही लोक असेही आहेत जे जवळच्या व्यक्तीचं निधन झालं तर दु:ख नाही तर आनंद व्यक्त करतात. हा आनंद साजरा करण्यासाठी असे लोक नाचगाण्याचे कार्यक्रम आयोजित करतात. आफ्रिकेतील घाना समाजात अशीच पद्धत आहे. या समाजातील लोक एखाद्याच्या मृत्यूनंतर लग्नसमारंभात केला जातो तसा जल्लोष करतात. त्या समाजात अशी परंपरा वर्षानुवर्षे सुरु आहे. एखाद्याचा मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबातील लोक पार्टीचं आयोजन करतात.

## व्यवहारांप्रती व्हावं साक्षर

समुपदेशन

* मी ३० वर्षांची महिला आहे. आम्ही दोघंही कमावत असल्यामुळे महिन्याकाठी घरात मोठी रक्कम येते. पण त्या मानाने पुरेशी गंगाजळी साठलेली नाही याचं दु:ख आहे. पतीने आर्थिक व्यवहाराची सर्व सूत्रं स्वत:च्या हातात ठेवली आहेत. तो स्वत:ला शेअर बाजाराचा जाणकार समजतो आणि अतिआत्मविश्वासाने शेअर्समध्ये भरपूर पैसे गुंतवतो. पण या नादापायी आजवर चार वेळा जबर नुकसान सहन केलं. या अनुभवानंतरही त्याला शहाणपण आलेलं नाही. तो स्वत:बरोबर माझी कमाईदेखील पणाला लावतो. यातून आमच्यात खूप भांडणं होतात. काय करु? त्याला कसं समजावू?



– शेअर बाजारातल्या व्यवहारांचं सखोल ज्ञान न घेता ऐकिव माहितीच्या आधारे पैसे गुंतवणारे आणि नुकसान झेलणारे अनेकजण आहेत. तुझा पतीही त्यातलाच. या बेहिशेबी वागण्याला आवार घाल. ही गुंतवणूक जाणकाराच्या सल्ल्याने करण्याविषयी आग्रह धर. ऐकत नसेल तर तुझा पगार त्याच्या हाती देणं तात्काळ थांबव. तू स्वत: आर्थिक व्यवहारांप्रती साक्षर हो आणि गुंतवणुकीचे निर्णय स्वत: घे. एखाद्या जवळच्या मित्राने अथवा नातेवाईकाने समज दिल्यास त्याला चूक समजेल का, याचा विचार कर. कदाचित त्यामुळे तो भानावर येऊन तुमच्यातली भांडणं कमी होतील.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahilyanagar (Ahmednagar) (M Corp), Dist.Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahilyanagar (M Corp), Dist Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहिल्यानगर (अहमदनगर) (एम कॉर्प), जिल्हा–अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड– ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा– अहमदनगर, पिन कोड– ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक– स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी– २३४५२७०, २३४७०८६, मो.– ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

**अर्ज़ किया है...**

*अब तो घबरा के ये कहते हैं कि मर जाएँगे*
*मर के भी चैन न पाया तो किधर जाएँगे*

**- शेख इब्राहीम ज़ौक**

पैसा, प्रतिष्ठा मिळाल्यावर माणूस मनःशांतीच्या शोधात असतो. पैसा असला तरी शांती लाभेलच असं नाही. अनेक अडचणी आणि व्याधीनीग्रस्त व्यक्तीला शेवटचा उपाय म्हणून मरण यावं, असं वाटतं; म्हणजे तरी शांती मिळेल, परंतु शायर म्हणतात मरणानंतरही शांती नाही मिळाली तर कुठे जाणार? त्यामुळे मनःशांतीसाठी याच जन्मात प्रयत्न करावे. त्यासाठी समाधानी वृत्ती असणे गरजेचे आहे. सध्या आपण पाहतो अनेक प्रतिष्ठित व्यक्ती कुंभमेळ्यात जातात, काही तर संन्यास स्वीकारत आहेत, कदाचित हाच त्यांचा मनःशांती मिळविण्याचा मार्ग असेल.

## कौटुंबिक न्यायालय वकील संघाच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा

# मराठी भाषा महाराष्ट्राच्या समृद्ध वारस्याचा भाग -न्या.भालेराव



**समाचार/नगर-दि.६**

भाषा ही संवादाचा अविभाज्य अंग आहे. आपले विचार भावना व्यक्त करण्याचे भाषा एक साधन आहे. महाराष्टात मराठी सर्वात जास्त वापरली जाणारी भाषा आहे. जिल्हा न्यायालय स्तरापर्यंतची न्यायालयीन कामकाजाची भाषा ही मराठीच आहे. मराठी फक्त भाषा नसून, महाराष्टाच्या समृद्ध वारस्याचा भाग आहे. मराठीच्या बोली भाषेने आणि मौखिक परंपरेने एक मोठी लोकसंस्कृती उभी केली असल्याचे प्रतिपादन कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधीश संगीता ना. भालेराव यांनी केले.

कौटुंबिक न्यायालय व कौटुंबिक न्यायालय वकील संघाच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. जुने जिल्हा न्यायालय येथील कौटुंबिक न्यायालयात झालेल्या कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणात यायाधीश भालेराव बोलत होत्या. याप्रसंगी लोक साहित्याचे मराठी अभ्यासक प्रा. डॉ. नवनाथ वाव्हळ, कौटुंबिक न्यायालय वकील संघाचे अध्यक्ष अॅड. लक्ष्मणराव कचरे, विशेष सरकारी वकील तथा उपाध्यक्ष अॅड. सुरेश लगड, सचिव अॅड. राजेश कावरे आदींसह कर्मचारी, वकील व पक्षकार उपस्थित होते.

पुढे बोलताना न्यायाधीश भालेराव म्हणाल्या की, वैविध्यपूर्णतेने नटलेली मराठी भाषा आहे. कोट्यावधी लोक मराठी बोलतात. समाज जीवनाला प्रगत करण्यासाठी भाषा विचारांचे साधन आहे. ग्रामीण भागातून येणाऱ्या पक्षकारांना देखील न्याय निर्णय समजावा यासाठी जास्तीत जास्त निकाल मराठीत देण्याचा प्रयत्न केला जातो. कौटुंबिक न्यायालयात आल्यापासून आता पर्यंत ८६ टक्के न्याय निवाडे मराठीतच दिले आहे. सर्वांनी मराठी भाषेचा अभिमान बाळगावा व भाषा समृद्ध करावी. तर येणाऱ्या पिढीला मराठी भाषेची गोडी लागण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. प्रा. डॉ. नवनाथ वाव्हळ म्हणाले की, न्याय संस्थेकडून मराठी भाषा संवर्धन कार्यक्रम होत असल्याचा मोठा आनंद आहे. मराठीला मोठ्या संघर्षातून अभिजीत मराठी भाषेचा दर्जा मिळाला आहे. याचा प्रत्येक मराठी माणसाला अभिमान आहे. त्यामुळे सरकारकडून दरवर्षी ३०० कोटी रुपये भाषेच्या विकासासाठी मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रास्ताविकात अॅड. लक्ष्मणराव कचरे यांनी मराठी भाषेला अभिजीत भाषेचा दर्जा मिळाला असताना मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात साजरा होत असल्याचे स्पष्ट करुन कार्यक्रमाचे उद्देश सांगितले. याप्रसंगी प्रबंधक एस.के. मोहोळकर, सहाय्यक अधीक्षक ए.आय. शेख, वरिष्ठ लिपिक सौ. झिंजे, स्टेनो एस.एफ. चव्हाण, कनिष्ठ लिपिक धीरज नारखेडे, सौ. तगारे, राहुल मोरे, शिपाई एस.के. जाधव, एल.एस. जाधव, अॅड. कैलास धावडे, अॅड. सुजाता बोडखे, अॅड. किरण पवार, अॅड. प्रतीक्षा मंगलारप, अॅड. के.एम. गोरे, अॅड. कैलास धावडे, पोलीस कर्मचारी भापकर, फालके, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अॅड.राजेश कावरे यांनी केले.



# मंत्री राणे, आ. जगताप यांनी घेतली दलित कुटुंबाची भेट

**समाचार/श्रीगोंदा-दि.६**

ससाणेनगर येथे झालेल्या दगडफेक प्रकरणाच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजातर्फे मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री नितेश राणे आणि आ. संग्राम जगताप यांनी त्या कुटुंबाची भेट घेतली. क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले चौक ते साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे स्मारक, ससाणेनगर वस्ती, श्रीगोंदा शहर असा मोर्चा काढण्यात आला.या मोर्चास आमदार विक्रम पाचपुते उपस्थित होते. श्रीगोंदा तहसीलदार समोर सुरु असलेल्या उपोषणस्थळी मंत्री नितेश राणे यांनी भेट दिली. राणे म्हणाले की, दिवाळी पाडव्या दिवशी ससाणे नगर येथे लहान मुले फटाके फोडत असताना किरकोळ कारणावरून जिहादी मानसिकतेच्या लोकांकडून दलित कुटुंबांच्या घरांवर दगडफेक करण्यात आली. त्यानंतर ज्या काही घटना घडल्या, त्याच्या निषेधार्थ सरकारचा प्रतिनिधी म्हणून हिंदू समाजाला धीर व ताकद देण्यासाठी आणि संदेश देण्यासाठी आलो आहे. हे सरकार हिंदुत्ववादी विचारांचे सरकार आहे. हे सरकार हिंदुच्या ताकदीमुळे स्थापन झालेले आहे. या सरकारच्या काळात हिंदुवर अन्याय सहन करणार नाही. हिंदू समाजातील प्रत्येक व्यक्तीला विश्वास द्यायचा आहे की, हे सरकार पूर्णपणे तुमच्या बरोबर आहे.

## पान १ वरुन

### सरकारी तिजोरीवर मोठा भार!

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राज्य सरकारने लाडक्या बहिणींसह राबविलेल्या विविध लोकप्रिय घोषणांमुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा भार पडला. त्याचा परिणाम सरकारच्या विकास कामांचा योजनांवर झाला असून काही याखेरीज सरकारी खात्यातील कर्मचाऱ्यांचे दरमहा वेतनही उशिराने होत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. या परिस्थितीत राज्याच्या यंदाच्या अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर राज्याची वित्तीय तूट भरून काढण्यासाठी सरकारच्या काही योजनांना कात्री लागणार असल्याची माहिती आहे. ही वित्तीय तूट एक लाख कोटींच्या घरात असल्याचे सांगितले जाते. राज्याच्या अर्थसंकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या विभागनिहाय बैठकीत याबाबत आढावा घेतला जाणार असून सरकारची वित्तीय तूट भरून काढण्यासाठी सरकारच्या आधीच्या काही योजनांना कात्री लावली जाणार आहे. त्यामध्ये सर्वसामान्यांसाठीच्या शिवभोजन थाळी, आनंदाचा शिधा अशा योजनांचा समावेश असल्याची माहिती आहे.

### २ आरोपी जेरबंद, ६ गुन्हे उघडकीस

दोघांच्या ताब्यातून दोन मोटारसायकल हस्तगत करण्यात आल्या. पारनेर, भिंगार कॅम्प, सुपा, बेलवंडी व एमआयडीसी पोलीस स्टेशनला दाखल गुन्हयांची पडताळणी करून ६ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

### त्यांनी कुस्तीवर बोलू नये

तुम्ही अजित दादांशी निगडित आहात म्हणून आम्ही थोडा मान-सन्मान राखतो, पण याचा कोणी गैरफायदा घेऊ नये. ज्यांना कधी लंगोट घालण्याचे माहिती नाही, त्यांनी कुस्तीवर बोलू नये असे म्हणत आ. संग्राम जगताप यांनी आमदार रोहित पवार यांच्यावर सडकून टीका केली.

# एकलव्य संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**समाचार/नगर-दि.६**

बेघर आदिवासी भिल्ल समाजाचा सर्वे करून ग्रामपंचायत हद्दीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या जागा आहे. त्यातून भूमिहीन आदिवासी भिल्ल समाजाच्या कुटुंबीयांना ग्रामपंचायत हद्दीमध्ये महाराष्ट्र शासनाची जागा राहण्यासाठी मिळवून द्यावी तसेच जागा नावावर नसल्याने आदिवासी भिल्ल समाजाच्या कुटुंबीयांना घरकुलाचा लाभ देखील घेता येत नसल्याने जागा नावावर करून देण्याच्या मागणीसाठी एकलव्य संघटनेचे महाराष्ट्र संघटक मोहन गोलवाड, महाराष्ट्र संघटिका वैजयंता गोलवाड व नाशिक सभापती शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

# ज्ञानेश्वरीतील साहित्य विचारी ग्रंथाचे प्रकाशन



**समाचार/नगर-दि.६**

संत ज्ञानेश्वचर माऊली यांच्या सप्त शतकोत्तर जन्म जयंतीनिमित्त गेल्या अनेक महिन्यांपासून आनंद विद्यालयात सुरु असलेल्या ज्ञानेश्वंरी पाठ्यग्रंथ वाचन व निरूपण वर्गाची सांगता करण्यात आली. यावेळी अभय आगरकर उपस्थित होते. यावेळी चार्टर्ड अकाउंटंट राजेंद्र काळे, ज्ञानेश्व री अभ्यास वर्गाचे संयोजक डॉ. दिलीप धनेश्वर, अभ्यास वर्गाचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे यांच्यासह अभ्यासवर्गात सहभागी साधक उपस्थित होते.

ज्ञानेश्वळरी अभ्यास वर्गातील साधकांना उपयुक्त ठरलेल्या टिपणींच्या श्री ज्ञानेश्वकरी अभ्यास पथदर्शी' या ग्रंथाचे प्रकाशन व प्राचार्य अनिल सहस्त्रबुद्धे लिखित श्री ज्ञानेश्वयरीतील साहित्य विचार' या ग्रंथाच्या तृतीय आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. त्याचबरोबर अभ्यासक व तज्ञ मान्यवरांच्या निबंधाच्या आधारे श्री ज्ञानेश्व रीचे साहित्य, सुसंस्कृत समाज कुटुंब व राज्य व्यवस्था, सर्वधर्म विचार आदी सर्वांगीण दृष्टीने ज्ञानेश्वेरी चिंतन असा ग्रंथ साकारण्याचा संकल्प करण्यात आला. डॉ. सहस्त्रबुद्धे यांनी सामूहिक चिंतन प्रकल्पाचा इतिहास कथन करून या चिंतन प्रकल्पाचे महत्त्व विषद केले. डॉ. दत्तात्रय भालेराव यांनी अभ्यास वर्गाची भूमिका मांडली.

## शंकर पोतदार यांचे निधन

**समाचार/नगर-दि.६**



शंकर केशव उर्फ बापूसाहेब पोतदार (वय ८१) यांचे आज सकाळी हृदयविकारच्या धक्क्याने पुणे येथे दुःखद निधन झाले. ते संघाचे जुने स्वयंसेवक व पदाधिकारी होते. अहमदनगर शहर मित्र मंडळ पुणेचे संस्थापक अध्यक्ष, आणि बापुज सर्व्हिसेसचे संस्थापक, समर्थ परिवारीचे संस्थापक राजाभाऊ पोतदार यांचे ते मोठे बंधू होते. अंत्यविधी सायंकाळी ५ वाजता वैकुंठ धाम पुणे येथे पार पडणार आहे.

# मधुकर महानूर यांना संविधान गौरव पुरस्कार प्रदान

**समाचार/जामखेड-दि.६**

जामखेड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृहाचे लिपिक मधुकर महानूर यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन संविधान अमृत महोत्सवात संविधान गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय मागासवर्गीय वसतीगृहात मधुकर महानूर हे दहा वर्षांपासून लिपीक म्हणून कार्यरत आहेत. केवळ खुर्चीवर बसून कागदे न रंगवता प्रत्यक्ष ग्राऊंडवर काम केले. यामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक, राहण्याची व्यवस्था, मिळणारे फायदे याबाबत वाडयावस्त्यावर, शाळा, कॉलेज येथे जाऊन विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश मिळवून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करून प्रवृत्त केले.



कोरोना काळात वसतीगृहाची इमारत शासनाने ताब्यात घेऊन तेथे कोरोना रूग्णांना २४ तास सेवा केली याबाबत आ. रोहीत पवार, तत्कालीन तहसीलदार विशाल नाईकवाडे यांना कोरोना यौध्दा म्हणून सत्कार केला. शासनाच्या जळगाव येथील कार्यक्रमात सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले, राज्यमंत्री दिलीप कांबळे यांच्या हस्ते उत्कृष्ट कामगिरी केली बद्दल गौरविण्यात आले होते.

समाजकल्याण नाशिक विभागाचे प्रादेशिक उपआयुक्त माधव वाघ, नगरचे सहाय्यक आयुक्त प्रवीण कोरगंट्टीवार, तत्कालीन सहाय्यक आयुक्त राधाकिसन देवढे यांच्या मार्गदर्शनानुसार शासकीय वसतिगृहात कामगिरी केली आहे.

# मंगला जाखोटिया यांचे निधन

**समाचार/नगर-दि.६**

शहरातील दाणेडबरा येथील रहिवासी मंगला जाखोटिया (वय ६६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुली व एक मुलगा नातवंडे असा परिवार आहे. मंगला जाखोटीया या नगर मधील चहाचे होलसेल व्यापारी बालकिसन जाखोटिया यांच्या पत्नी व मुकुंद जाखोटिया यांच्या मातोश्री होत. तसेच उद्योजक शामसुंदर व श्रीगोपाल जाखोटिया यांच्या त्या भावजयी होत. स्व. मंगला जाखोटिया या धार्मिक स्वभावाच्या म्हणून परिचित होत्या.



# संत मीराबाई चरित्र कथा सोहळ्याचे आयोजन

**समाचार/नगर-दि.६**

श्रीरामकृष्ण सेवा ट्रस्टव्दारा नगरमध्ये प्रथमच जोधपूर (राजस्थान) येथील पूज्य राधाकृष्ण महाराज यांच्या अमृतवाणीने संत मीराबाई चरित्र कथा सोहळ्याचे आयोजन दि.८ ते १० फेब्रुवारी दरम्यान दुपारी ३ ते ६ या वेळेत नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉनमध्ये करण्यात आले आहे. या सोहळ्याची जय्यत तयारी झाली आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष नंदलाल मणियार यांनी दिली.

ते म्हणाले, प. पू. रामचंद्र डोंगरे महाराजांच्या प्रेरणेने १९८२ साली श्रीरामकृष्ण सेवा ट्रस्टची स्थापना करण्यात आली. संत-महंतांचे कार्यक्रम आणि कथा सोहळ्यांचे आयोजन प.पू.श्री.गोविंददेव गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली आजपर्यंत अखंडपणे ट्रस्टच्या माध्यमातून सुरू आहे. पूज्य राधाकृष्ण महाराजांना नगर शहरात २०१२ साली श्रीमद् भागवत कथा सोहळ्यासाठी आणण्याचे कार्य ट्रस्टनेच सर्वप्रथम पार पाडले होते.





ट्रस्टचे उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, सचिव सुरेश चांडक, खजिनदार मगनलाल पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत निर्माण करण्यात आलेल्या समित्या आणि समिती प्रमुख असे :- मंडप व्यवस्था समिती प्रमुख-शरद झंवर, कार्यालय समिती प्रमुख- हिरालाल पटेल, प्रचार व प्रसार समिती प्रमुख- रामेश्वर बिहाणी, मिलिंद चवंडके, बजरंग दरक, अर्थ समिती प्रमुख- राजेंद्र गुजराथी व नितीन मंत्री, पूर्जाअर्चा व धार्मिक अनुष्ठान समिती प्रमुख- हर्षल शहा, अतिथी निवास समिती प्रमुख- विनोद पटेल व सोमनाथ नजान, भोजन प्रसाद समिती प्रमुख- सुरेश चांडक व देवकिसन मणियार, प्रसाद वितरण समिती प्रमुख- पुरूषोत्तम नावंदर, जनसंपर्क समिती प्रमुख- मधुसूदन सारडा व विजय पंजाबी, वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख डॉ.विजय भंडारी, स्टोअर समिती प्रमुख- पुरूषोत्तम पटेल, पार्किंग व्यवस्था समिती प्रमुख- विशाल पटेल. कार्यक्रम सूत्रसंचलन-कु.हर्षा गुजराथी.

## सेक्रेटरी सविता झंवर; खजिनदारपदी उज्ज्वला इंदानी

# ज्यु. राजस्थानी बहु मंडळाच्या अध्यक्षपदी बलदवा

**समाचार/नगर-दि.६**

येथील ज्यु. राजस्थानी बहु मंडळाच्या अध्यक्षपदी अलका बलदवा यांची फेरनिवड एकमताने करण्यात आली. तर सेक्रेटरीपदी सविता झंवर यांची आणि खजिनदारपदी सौ. उज्वला इंदानी यांची निवडही एकमताने करण्यात आली. ज्यु. राजस्थानी बहु मंडळाच्या नूतन कार्यकारिणी निवडीची सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. या सभेत मंडळाच्या कार्यकारिणी सदस्यांची निवड करण्यात आली. ती अशी :- सौ.अंकिता हेडा, सौ.मोनिका गट्टाणी, खुशबू बिहाणी, तेजस्विता बलदवा, ज्योती सोमाणी, निकिता बाहेती,







पूजा लड्डा, शितल बिहाणी, प्रिती झंवर, .अश्विनी सोनी.

अलका बलदवा म्हणाल्या, प्रतिभा धूत, नंदा सोमाणी, पुष्पा मणियार, सरस्वती झंवर, काशीबाई हेडा यांचे मार्गदर्शन आणि गीता गिल्डा व शोभा काबरा यांची खंबीर साथ मिळत राहिल्याने विविध समाजोपयोगी उपक्रम यशस्वीपणे राबवले. राजस्थानी महिला मंडळाच्या अध्यक्षा शोभा राठी, राजस्थानी बहु मंडळाच्या अध्यक्षा शोभा सोनी, सावेडी महिला मंडळाच्या अध्यक्षा स्नेहलता सोमाणी, सावेडी बहु मंडळाच्या अध्यक्षा अनुप्रिती झंवर यांनी सतत प्रोत्साहन देत उत्साह वाढवत ठेवला. माझ्या संकल्पना साकारण्याकरिता सेक्रेटरी जया बिहाणी आणि खजिनदार अर्चना मालू यांनी मोलाची साथ देत कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

महानंदा पॉली प्रॉडक्टच्या अनिता सोनी आणि काबरा क्रिएशनच्या मिनाली काबरा यांनी प्रायोजकत्व देत कार्यक्रमासाठी योगदान दिले. अंगणवाड्या, बाबावाडी, अनामप्रेम, मतीमंद मुलींची शाळा, अरूणोदय गोशाळा अशा विविध स्वयंसेवी संस्थांना गरजेच्या उपयुक्त साहित्यासह रोख स्वरुपात मदती दिल्या. नो डेकोरेशन, गिव्ह डोनेशन या अभिनव संकल्पनेमधून कार्यक्रम राबवले. कार्यक्रमाचा आनंद लुटल्याने आमचाही उत्साह वाढत राहिला. १६० महिलांचे संघटन करण्याचे कार्य करू शकले. इनरव्हिल क्लब, रोटरी क्लब आणि जिव्हाळा ग्रुपमध्ये मी कार्यरत असल्याने तेथील कार्यक्रम नियोजनाच्या अनुभवाचा फायदा मला येथे झाला, असे अलका बलदवा यांनी सांगितले. यावेळी अर्चना पुंगलिया, रिमा मणियार, अनिता मंत्री, स्नेहा सोनी, वंदना राठी, डॉ.रूची अट्टल, डॉ.पायल धूत, शितल डागा, मोना झंवर, चेतना काबरा, दुर्गा जाजू, सोनल सोमाणी, जया चांडक, शितल काबरा उपस्थित होत्या.


**समाचार**

**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## मुंबई शेअर भाव

**परकीय संस्थांचा विक्रीचा जोर कायम**
**सेन्सेक्समध्ये ३०० अंकांनी घट**

(शेअर सबब्रोकर)
अशोक पटवा
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१

**दिनांक ६-०१-२०२५**
**दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७७९२७ |
| एसीसी | १९९४-९५ |
| एशियन पेंट | २२६८-६९ |
| बजाज ऑटो लि. | ८८६१-६२ |
| बलराम फूड चिनी | ४७४-७५ |
| भारत फोर्ज | ११४५-४६ |
| क्रॉम्प्टन | ३६३-६४ |
| डीएलएफ | ७६६-६७ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | १२४२-४३ |
| ग्रॅफाईट इंडिया | ५०८-०९ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २३७१-७२ |
| आयटीसी लि. | ४४१-४२ |
| एल ॲण्ड टी लि. | ३३५५-५६ |
| रिलायन्स इंड. | १२७५-७६ |
| एसबीआय | ७६०-६१ |
| टाटा मोटर्स | ७१३-१४ |
| टाटा स्टील | १३२-३३ |
| टीसीएस | ४०५३-५४ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | २२३-२४ |
| सुवेन फार्मा | ११६४-६५ |

### इंदिरानगर जिल्हा परिषद शाळेला संगणक, जलशुद्धीकरण यंत्र भेट

# सकारात्मक दृष्टिकोन जोपासत सामाजिक कर्तव्य बजवावे- कोतकर

**समाचार/नगर-दि.६**

सार्वजनिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या आयडीबीआय बँकेने दौंड रोडवरील इंदिरानगर भागातील जिल्हा परिषद शाळेला संगणक संच, पाण्याची १ टाकी व जलशुद्धीकरण यंत्र भेट दिले. सर्वसामान्य विद्यार्थ्यांप्रती सेवा भावनेतून राबविलेला हा उपक्रम कौतुकास्पद असून बँकेने सामाजिक बांधिलकी जपली, आपण समाजात वावरत असताना समाजाचे काहीतरी देणे लागतो, या भावनेतून सकारात्मक दृष्टीकोन जोपासत प्रत्येकाने सामाजिक कर्तव्य बजवावे, असे प्रतिपादन महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर यांनी केले.



आयडीबीआय बँकेच्या वतीने मिशन आपुलकीच्या माध्यमातून इंदिरानगर जिल्हा परिषद शाळेला संगणक संच, पाण्याची टाकी व जलशुद्धीकरण यंत्र भेट देण्यात आली. यावेळी माजी सभापती मनोज कोतकर, आयडीबीआय बँक दिल्लीगेट शाखाप्रमुख शिल्पा भदोरीया, मॅनेजर रिजनल ऑफिस अरुण राऊत, शाळेचे मुख्याध्यापक आप्पा जाधव व सहशिक्षक अनुजा रिंगणे आणि शाळेतील सर्व विदयार्थी उपस्थित होते.

भदोरीया म्हणाल्या की, आयडीबीआय बँकेच्या वतीने नेहमीच मिशन आपुलकीच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवण्यात येतात. या उपक्रमासाठी माजी नगरसेवक मनोज कोतकर यांनी पाठपुरावा केल्याने जि.प. शाळेत भेट दिलेल्या या वस्तूंची खरीच गरज होती. त्या आम्ही बँकेच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्याने मनाला समाधान वाटले असे त्या म्हणाल्या.

# विशाल गणेश मंदिरात महिलांची नेत्र तपासणी

**समाचार/नगर-दि.६**

फिनिक्स सोशल फाऊंडेशन व सम्राट तरुण मंडळाच्या वतीने वतीने भिंगार येथील गणेश जयंतीनिमित्त मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. गवळीवाडा येथील विशाल गणेश मंदिरात झालेल्या या शिबिरास महिला भाविकांचा उत्सफूर्त प्रतिसाद लाभला. तसेच यावेळी मरणोत्तर नेत्रदान व अवयवदानाची जागृती करण्यात आली. नेत्रदान व अवयव दानाचा संकल्प केलेल्या महिलांनी अर्ज भरुन दिले.



जालिंदर बोरुडे म्हणाले की, समाजात मरणोत्तर नेत्रदान व अवयवदान होत नसल्याने अनेक रुग्ण नेत्र व अवयवाच्या प्रतिक्षेत आहे. एका व्यक्तीच्या अवयवदानाने सात व्यक्तींना जीवदान मिळते. शरीर हे नश्वदर असून, मरणोत्तर अवयवदानाने एखाद्याचे जीवन फुलणार आहे. तर या शिबिराच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना आधार देण्याचा प्रयत्न केला जात आहे. महिलांनी धकाधकीच्या जीवनात आपल्या आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. गरजू महिलांवर मोतीबिंदूच्या मोफत शस्त्रक्रिया केल्या जाणार असल्याचे त्यांनी माहिती दिली. या शिबिरात सहभागी गरजूंना अल्पदरात चष्म्यांचे आणि मोफत औषधाचे वाटप करण्यात आले. या शिबिराच्या यशस्वितेसाठी फिनिक्स सोशल फाऊंडेशन व सम्राट तरुण मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# डॉ.हळबे बालभवनास स्मार्ट एल.ई.डी भेट



**समाचार/नगर-दि.६**

स्नेहालय संचलित डॉ. हळबे बालभवनात मुलांना ई लर्निंग च्या माध्यमातून शिक्षण देता यावे तसेच हसत खेळत शिक्षण मुलांना मिळावे, मुलांमध्ये अभ्यासाची गोडी निर्माण व्हावी या उद्देशाने संजयनगर येथील डॉ. एस.के. हळवे बालभवनास स्मार्ट एल.ई.डी टीव्हीची भेट मनोरथ फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमतून दिली.

कार्यक्रम प्रसंगी मनोरथ फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा मनीषा भिंगारदिवे, ॲड. नरेंद्र भिंगारदिवे, अली शिवा वाघमारे, नंदाताई बडे, संगीता भालेराव, मंदाताई लोखंडे, डॉ.रॉबिन तडसे, राम लोंढे, अर्पणा देवतरसे, ॲड.अर्पिता मिसाळ आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अंबादास पोटे यांनी सर्व अतिथींची ओळख करून दिली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या पद्धतीत लक्षणीय बदल होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी हा महत्वाचा टप्पा ठरणार आहे, असे प्रतिपादन मनोरथ फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टच्या मनीषा भिंगारदिवे यांनी केले. उषा खोल्लम यांनी बालभवन प्रकल्प व त्याचे ध्येय उद्दिष्ट स्पष्ट करून कार्याची ओळख करून दिली.

दिपाली बोरुडे यांनी संजय नगर पुनर्वसन प्रकल्पांचे ध्येय व उद्दिष्टे व भविष्यातील प्रकल्पाचे नियोजन सांगितले. आभार शारदा न्यानपेल्ली यांनी मानले.

# काश्मीरमधील अनाथ मुलींसाठी महाराष्ट्राच्या मैत्रिणींचा अनोखा उपक्रम

**समाचार/नगर-दि.६**

काश्मीरमधील संघर्षामुळे अनाथ झालेल्या मुलींच्या पुनर्वसनासाठी कार्य करणाऱ्या बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशनमध्ये महाराष्ट्रातील १७ महिलांनी जाऊन मुलींना शिक्षण आणि स्वावलंबनाचे धडे दिले. १० जानेवारी ते २० जानेवारी या काळात झालेल्या या उपक्रमात विविध कौशल्ये शिकवून मुलींना आत्मनिर्भर करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

समाजसेवेची जिद्द :आधिक कदम या युवकाची – बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशनची स्थापना आधिक कदम यांनी २००२ मध्ये केली, परंतु त्यांचा समाजसेवेचा प्रवास १९९७ मध्येच सुरू झाला. किशोरवयातच त्यांनी काश्मीरमध्ये सुरू असलेल्या संघर्षामुळे निराधार झालेल्या मुलींना पाहिले आणि त्यांचे जीवन सुधारण्यासाठी कार्य करण्याचा निर्धार केला.

पुणे, ठाणे, डोंबिवली, वाशी, सातारा, नगर येथील १७ महिलांनी एकत्र येऊन काश्मीर आणि जम्मूमधील १०३ मुलींना



स्वावलंबन आणि रोजगारक्षम कौशल्ये शिकवण्याचा निर्णय घेतला. कोणत्याही संस्थेला पालकत्वाची जबाबदारी निभावतांना अनंत समस्या येतात, त्यातील एक समस्या म्हणजे मनुष्यबळाचा अभाव. कोणत्याही घरामध्ये एका मुलामागे आई-वडील आणि असतील तर आजी आजोबा असे किमान चार लोक लक्ष देण्यासाठी, संस्कार करण्यासाठी असतात. पण संस्थेमध्ये एवढी माणसे उपलब्ध होऊ शकत नाही. आम्ही मैत्रिणींनी ठरवले आपण वर्षभर कुटुंबाची, मुलांची, नातेवाईकांची जबाबदारी घेतच असतो, त्यातून वेळ काढून आपण या मुलींचे किमान सात दिवसासाठी पालकत्व घेऊया. आम्हा सतरा जणी पैकी बहुतेक जणी व्यवसाय करतात, नोकरी करतात, बऱ्याच जणी वेगवेगळ्या कलांमध्ये निपुण आहेत. मग आम्ही ठरविले आपण अशा गोष्टी मुलींना शिकवू या ज्यामुळे त्या वस्तू तयार करायला शिकल्यानंतर भविष्यामध्ये त्या वस्तूंची विक्री करून त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहू शकतात.

सेल्फ डिफेन्स आणि योगासने, पेपर क्विलिंग, मोत्याचे दागिने आणि लिप्पन आर्ट, महाराष्ट्रीयन पदार्थांची ओळख, माईंडफुलनेस मेडिटेशन आणि बौद्धिक सत्रे, चारचाकी चालवण्याचे प्राथमिक प्रशिक्षण, वॅक्स पावडर, साबण, परफ्यूम आणि फेशियल बॉम्ब तयार करणे, पुष्पऔषधी आणि आयुर्वेदातील १२ क्षारांचा वापर, अशा गोष्टी शिकवल्या.

नगरमधून सहभागी झालेल्या जयश्री सोमाणी, अनुराधा बिहाणी,व दीपिका भारदे यांनी मोत्याच्या वस्तू, सूर्यनमस्कार, लिपन आर्ट शिकविले. नीता म्हस्के व गीता देशमुख यांनी इन्स्टंट रांगोळी, पेपर क्विलिंग व महाराष्ट्रीयन पदार्थ शिकविले. पद्मजा धोपावकर यांनी सेल्फ डिफेन्स, इन्स्टंट रांगोळी, मोत्याचे दागिने शिकविले. डॉ. अंशू मुळे यांनी माईंड फुलनेस मेडिटेशन, बौद्धिक सत्र व पेपर क्विलिंग शिकविले. बॉर्डरलेस वर्ल्ड फाउंडेशनने अतिशय उत्कृष्ट व्यवस्थापन केले. जम्मूमधील कडाक्याच्या थंडीतही महिलांना कोणतीही अडचण आली नाही.

या उपक्रमानंतर दरवर्षी ७ दिवस समाजसेवेसाठी द्यायचे असा निर्णय या महिलांनी घेतला आहे.

# हॅलो डॉक्टर

**कोरोना सारख्या महाभयंकर साथीच्या आजारानंतर आता महाराष्ट्रातील पुणे शहरात गुईलीन बरे सिन्ड्रोम जीबीएस सारख्या एका नव्या विषाणूजन्य आजाराची साथ पसरलेली आहे. याच विषाणूची लागण होऊन पुण्यात एका महिलेचा मृत्यू झालेला आहे.**




**त्यामुळेच जीबीएस या नव्या विषाणूजन्य आजाराबाबत जनमानसात साशंकता निर्माण झालेली आहे. गुईलीन बरे सिंड्रोम हा विषाणूजन्य आजार नेमका आहे तरी काय? या आजाराची लक्षण काय असतात? कारण काय आहेत? आणि या आजारावर उपचार नेमके उपलब्ध आहेत का? या संदर्भात डॉ. विवेक गांधी यांच्याशी साधलेला संवाद.**

**गुईलीन बरे सिंड्रोम हा आजार नेमका काय आहे?**

गुईलीन बरे हा एक दुर्मिळ प्रकारचा आजार असून यामध्ये रुग्णाची प्रतिकारशक्ती कमी होते. यामध्ये काही विशिष्ट प्रकारचे विषाणू शरीरांतर्गत नसांवर हल्ला करतात. त्यामुळे बधिरपणा येतो. हातापायाला मुंग्या येतात, तसेच आपले स्नायू देखील कमकुवत होतात. या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास अर्धांगवायूचा झटका देखील येऊ शकतो. मात्र योग्य वेळी योग्य ते उपचार केले तर रुग्ण या आजारातून पूर्ण बारा होऊ शकतो.

**गुईलीन बरे सिंड्रोम या आजाराची कारण काय आहेत?**

हा आजार काही प्रकारचे संसर्ग झालेल्या व्यक्तीला होऊ शकतो. जीबीएस झालेल्या ७० टक्के लोकांमध्ये त्यांची लक्षण आजाराच्या एक ते सहा आठवड्यांच्या आत सूर होतात. काही आजारांमध्ये आपली रोगप्रतिकारशक्ती कमी झाली की जीबीएसचे विषाणू शरीरातील नसांवर हल्ला करतात आणि हा आजार बळावतो. प्रतिकारशक्ती कमी झाल्याने जीबीएस चे विषाणू मज्जातंतूंवर हल्ला करतात आणि जीबीएस आजार उद्भवतो. अतिसार किंवा श्वसन संक्रमण, व्हायरल इन्फेक्शन आणि काही विशिष्ट प्रकारची लस दिली की जीबीएस आजार होऊ शकतो.

**गुईलीन बरे सिंड्रोम आजाराची लक्षण काय असतात?**

गुईलीन बरे सिंड्रोम आजाराची लक्षण म्हणजे पाठीत किंवा पायामधे खोल स्नायूमध्ये वेदना होतात. हातापायाला किंवा चेहऱ्याला अर्धांगवायूचा झटका येऊ शकतो.छातीचा स्नायू कमकुवत झाल्याने श्वसनाचा प्रचंड त्रास होतो. बोलताना किंवा अन्न गिळताना खूप त्रास होतो. दृष्टी अधू होते डोळे हलवण्यास देखील त्रास होतो. जीबीएसची लक्षण ही काही तास, दिवस किंवा काही आठवडे वाढू शकतात. लक्षण जाणवू लागल्यानंतर काही लोक पहिल्या दोन आठवड्यात सर्वात गंभीर टप्प्यावर पोहचतात.

**या आजारावर उपचार नेमके काय आहेत?**

गुईलीन बरे सिंड्रोम या आजाराची बाधा झाली की तुम्हाला हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागात दाखल केले जाते. हॉस्पिटलमधील तज्ज्ञ डॉक्टर्स रुग्णाची अवस्था पाहून त्याचे क्षणाक्षणाला निरीक्षण नोंदवून उपचार करतात. या आजारावर तसा ज्ञात उपचार उपलब्ध नाही. मात्र काही विशिष्ट प्रकारच्या थेरेपी देऊन या आजाराचा धोका कमी करू शकतात. प्लाझ्मा एक्स्चेंज उपचारांद्वारे रुग्णाच्या शरीरातील रक्तातील प्लाझ्मा मशीनद्वारे वेगळा केला जातो आणि रक्त पुन्हा शरीरात सोडले जाते यामध्ये शरीरातील अँटीबॉडीज फिल्टर केल्या जातात. इंट्राव्हेन्स इम्युनो ग्लोबुलीन थेरेपीमध्ये इंजेक्शन दिले जाते आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढविली जाते.



# ड्रॅगन फ्रूटचे फायदे

**आरोग्यम् धनसंपदा**

ड्रॅगन फ्रूट हे सुपरफ्रूट मानले जाते कारण ते आरोग्यासाठी खूप चांगले असते. या फळाचे सेवन केल्यास मधुमेह आणि हृदयविकाराचा धोकाही कमी होतो. ड्रॅगन फ्रूटमध्ये अँटी-ऑक्सिडंट्स, फायबर्स आणि व्हिटॅमिन सी आढळतात. हे अनेक गंभीर आजार बरे होण्यास मदत करतात. चला तर मग जाणून घेऊया ड्रॅगन फ्रूट खाण्याचे आणखी काही फायदे. ड्रॅगन फ्रूट ऊर्जा समृद्ध फळ आहे. एका ड्रॅगन फळामध्ये १०२ कॅलरी ऊर्जा असते. कार्बोहायड्रेट्सचा हा एक उत्तम स्रोत आहे. एका ड्रॅगन फळामध्ये २२ ग्रॅम कार्बोहायड्रेट्स असतात. याशिवाय १३ ग्रॅम साखरही असते. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे ड्रॅगन फ्रूटमध्ये फॅट नसते. त्यामुळे हृदयरोग्यांसाठी ड्रॅगन फ्रूट अत्यंत उपयुक्त आहे. ड्रॅगन फ्रूटच्या बियादेखील खूप फायदेशीर असतात. ड्रॅगन फ्रूट पचनक्रिया बळकट बनवते. याच्या बियांमध्ये ओमेगा-३ आणि ओमेगा-९ फॅटी ॲसिड्स आढळतात. ज्यामुळे हृदयाच्या पेशी मजबूत होतात. ड्रॅगन फ्रूटमध्ये फॅट अजिबात नसते. त्यामुळे शरीरातील कोलेस्ट्रॉलचे प्रमाण नियंत्रित राहते.

# अबॉट एओर्टिकचे स्टेनोसिसच्या उपचारांसाठी मनेक्स्ट जनरेशन नॅव्हिटर व्हिजन

**जनआरोग्य**

अबॉट जागतिक आरोग्य सेवा कंपनी आहे आणि तिने भारतात नॅव्हिटर व्हिजन लाँच करण्याची घोषणा केली जे रोगलक्षणात्मक गंभीर एओर्टिक स्टेनोसिसने पीडित असलेल्या उच्च किंवा अत्यंत शस्त्रक्रियेचा धोका असलेल्या रूग्णांवर उपचार करण्यासाठी आहे. हे डिव्हाइस कंपनीच्या नॅव्हिटर ट्रान्सकॅथेटर एओर्टिक व्हॉल्व्ह रोपण (इम्प्लांटेशन) / प्रतिस्थापन (रिप्लेसमेंट) (टीएव्हीआय / टीएव्हीआर) प्रणालीची आधुनिक पुनरावृत्ती आहे.

नेव्हिटर प्लॅटफॉर्म त्याच्या स्थिर पद्धतीने सोडण्यासाठी (डिलिव्हरी साठी), उल्लेखनीय कार्य आणि भविष्यातील तयारीसाठी प्रसिद्ध आहे आणि टीएव्हीआय / टीएव्हीआर प्रक्रिया चालू असताना चांगल्या प्रकारे पाहता यावे आणि व्हॉल्व्हचे रोपण आरामात करता यावे म्हणून त्यात तीन मोठे व्हिजन मार्कर्स देण्यात आलेले आहेत. हे मार्कर्स प्रक्रिया चालू असताना हस्तक्षेप करणारांना डिव्हाइसचे रोपण अधिक अचूकपणे करू देतात आणि त्याचवेळी टीएव्हीआय व्हॉल्व्ह पाहणे सुलभ करतात.

एओर्टिक स्टेनोसिस हा सर्वात सामान्य आणि जीवघेण्या हृदय व्हॉल्व्ह रोगांपैकी एक आहे. एओर्टिक हृदयाच्या व्हॉल्व्ह मधून शरीराच्या इतर भागांमध्ये रक्तप्रवाह होण्यात एओर्टिक स्टेनोसिसमुळे बाधा आल्याने हृदय बंद पडू शकते, चांगल्या प्रकारे आयुष्य जगता येत नाही आणि काही प्रकरणांमध्ये हृदयविकारामुळे आकस्मित मृत्यू होऊ शकतो. बऱ्याच लोकांना लक्षणे नजरेत येणारी नसली तरी, भारतात, ७५ वर्षे किंवा त्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या ४० पैकी एका व्यक्तीस तीव्र, लक्षणात्मक एओर्टिक स्टेनोसिस असतो. टीएव्हीआय पूर्वी, शस्त्रक्रिया करून एओर्टिक व्हॉल्व्ह प्रतिस्थापित करणे गंभीर एओर्टिक स्टेनोसिसची काळजी घेताना प्रमाणभूत असते, परंतु सर्व रुग्णांवर ओपन-हार्ट शस्त्रक्रिया करणे शक्य नसते. ट्रान्सकॅथेटर एओर्टिक व्हॉल्व्ह इम्प्लांटेशन (टीएव्हीआय) ही एक अत्याधुनिक, कमीतकमी आक्रमक प्रक्रिया आहे जिचा वापर हृदयातील खराब झालेल्या एओर्टिक व्हॉल्व्हची जागा घेण्यासाठी केला जातो. पारंपरिक ओपन-हार्ट शस्त्रक्रियेच्या विपरीत, टीएव्हीआय लहान चिरांद्वारे केले जाते आणि या चिरा बऱ्याचदा मांडीत केल्या जातात. नीरज सिंग, भारतातील अबॉटच्या स्ट्रक्चरल हार्ट बिझनेसचे कंट्री मॅनेजर म्हणाले, काही लोकांसाठी ओपन-हार्ट शस्त्रक्रिया ही उच्च जोखमीची प्रक्रिया मानली जाते कारण वय, अशक्तपणा किंवा इतर अनेक रोग किंवा अवस्था असल्याने संभाव्य गुंतागुंत होऊ शकते. टीएव्हीआय शस्त्रक्रिया करून एओर्टिक व्हॉल्व्ह प्रतिस्थापन करण्यासाठी कमी आक्रमक पर्याय म्हणून कार्य करते आणि लक्षणे कमी करू शकते आणि याने पीडित रूग्णांचे आयुष्य सुधारू शकते.

**लोकारोग्य**

संकलन-संयोजन
सुबोध रणशेवरे
subodh.ranshevre rediffmail.com

## शब्दखेळ - ३१४

**खाली दिलेल्या चौकोनात मराठी साहित्यातील एका सुप्रसिध्द कवीचे नाव लपलेले आहे शोधा पाहू.**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| च | था | सां | ड | शी | टी | न | सु |
| म | ना | ट | णे | इ | ला | ट | प |
| चा | स | डा | व | रा | ड | अ | टा |
| त्ता | गो | व | टा | ती | व | हि | ता |
| पा | चा | री | ट | ची | म | टा | ट |
| ते | र | न | व | या | ठो | स्ता | टा |
| ल | टी | प | न्या | ळ | डे | न | वा |
| वें | वा | य | ल | थ | ण | ण | टी |

**शब्दखेळ - ३१३ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वि | कि | सृ | दा | ल | ने | टा | टा |
| दा | ब | उ | दा | णे | थी | गा | रा |
| नी | द्या | वा | ट | ए | भा | ह | गो |
| ख | नी | डी | रो | सा | जी | का | द |
| अं | ळू | या | दा | र | ण | चे | व |
| ध | बी | र | ल | ची | वि | प्रो | ख |
| नी | डी | र्ला | ड | झ | न | ल | स्क |
| दि | ला | र्स | न | ल | ले | टू | बों |

**उत्तर - विद्याधर गोखले**

### जनकल्याण रक्तकेंद्राचा शिबीर संयोजक स्नेहमेळावा उत्साहात

# थॅलेसेमियाच्या प्रतिबंधासाठी जनजागृती एकमेव पर्याय-डॉ. वाणी

**समाचार/नगर-दि.६**

जशा प्रत्येक व्यक्तीच्या हस्तरेषा सारख्या नसतात तसेच प्रत्येक व्यक्तीचे रक्तातील हिमोग्लोबिनही सारखे नसते. जर हिमोग्लोबिन मध्ये संख्यात्मक फरक झाला तर ती व्यक्ती थॅलेसीमिया ग्रस्त होते. हा अनुवंशिक दोष आहे. थॅलेसीमिया रोग बरे करण्याचा एका रुग्णाचा खर्च १६ कोटी रुपये एवढा मोठा आहे. ते प्रत्येक रुग्णाला अशक्यच आहे. त्यामुळे थॅलेसीमिया रोगाच्या प्रतिबंधासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करणे हा एकमेव पर्याय आहे. यासाठी सामाजिक काम करणाऱ्या प्रत्येकाने व रक्तदान शिबिरांचे आयोजन करणाऱ्या संस्थांनी पुढाकार घेऊन समाजामध्ये जनजागृती करावी, असे आवाहन थॅलेसीमियाच्या जनजागृतीसाठी राष्ट्रीय स्तरावर काम करणारे डॉ.दिलीप वाणी यांनी केले. नगर येथील जनकल्याण रक्तकेंद्राच्या वतीने नगर शहर व जिल्ह्यात वर्षभर रक्तदान शिबिरांचे आयोजन करणाऱ्या शिबीर संयोजक संस्था, युवक मंडळ व ग्रुपच्या सदस्यांप्रती ऋण व्यक्त करण्यासाठी



विशेष स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख वक्ते डॉ.दिलीप वाणी बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे कॅरीयर मायडिया इंडिया कंपनीचे प्लँट हेड जयदेव सिंग होते. यावेळी रा.स्व. संघाचे जिल्हा संघचालक वाल्मिक कुलकर्णी, रक्तपेढीचे अध्यक्ष अभय मेस्त्री, कार्यवाह सतीश इंदानी आदी उपस्थित होते. या स्नेहमेळाव्यास जिल्ह्यातून आलेले शिबीर संयोजकांना गौरव पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

जयदेव सिंग म्हणाले, सुपा येथील कॅरियर मायडिया इंडिया या कंपनीच्या सीएसआर फंडातून सेवा कार्य करणाऱ्या संस्थांना मदत करत आहे. जनकल्याण रक्तपेढीचे रक्त संकलन व रक्तपुरवठ्याचे कार्य पाहून खूप प्रभावित झालो आहे. या कार्यात नागरिकांनी नित्याने सहभागी होत नियमित रक्तदान करावे, असे आवाहन त्यांनी केले. सतीश इंदानी म्हणाले, गेल्या वर्षी जनकल्याण रक्त पिढीने मोठ्या उत्साहात स्थापनेचे रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे केले आहे. रक्तपेढीच्या या सेवा कार्यात सर्व रक्तदाते, शिबिर संयोजक, रक्तदान शिबिरांचे आयोजन करून समिधा टाकून हा यज्ञ कायम सुरु ठेवत आहेत. नगर मधील ९४६ थॅलेसीमिया ग्रस्त रुग्णांना मोफत रक्तपुरवठा करणारी जनकल्याण रक्तपेढी एकमेव आहे, असे सांगून गेल्या वर्षभरात झालेल्या २५४ शिबिरांच्या माध्यमातून ९२०३ रक्त पिशव्यांचे संकलन झाले असून त्याद्वारे २१ हजार २८६ रक्तपेशव्यांचे वितरण वर्षभरात केले आहे.

यावेळी जनकल्याण समितीचे चंदन कटारिया, मुकुल पाटगावकर, माजी कार्यवाह दिलीप धनेश्वर, रा.स्व.संघाचे जिल्हा कार्यवाह हिराकांत रामदासी, रक्तपेढीचे सहकार्यवाह आदित्य चांदेकर, कोषाध्यक्ष अनिल धोकरीया, रुपेश भंडारी, पंकज यादव, प्रा. भानुदास जगताप आदी उपस्थित होते. डॉ.रुपाली म्हसे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला, सोनाली खांडरे यांनी सूत्रसंचालन केले तर सागर उंडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रक्त केंद्राचे डॉ. विलास मढीकर, स्मिता बडवे, शरद बळे, गजेंद्र सोनवणे यांनी परिश्रम घेतले.



# काकासाहेब म्हस्के फौंडेशनकडून आ.जगताप यांचा गौरव

**समाचार/नगर-दि.६**

माजी आ. काकासाहेब म्हस्के यांनी गोरगरीब, शेतकरी, शेतमजूर, वंचितांना न्याय देण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांचा जीवनपट आपल्यासाठी प्रेरणादायी असून त्यांच्या विचारांचा वारसा जपत काकांची तिसरी पिढी समाजकारणात आपले मोलाचे योगदान देत आहे हे अभिमानास्पद आहे. म्हस्के आणि जगताप परिवाराचे ऋणानुबंध खूप जुने आहेत, प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले.

आ.जगताप यांची नगर शहरातून तिसऱ्यांदा आमदारपदी तसेच महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या उपाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल काकासाहेब म्हस्के मेमोरियल मेडिकल फाउंडेशनच्या वतीने सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे कार्यकारी विश्वस्त डॉ.सुभाष म्हस्के, उद्योजक बाबासाहेब पिसोरे, विश्वस्त डॉ. सुमति म्हस्के, विश्वस्त डॉ.अभितेज म्हस्के, विश्वस्त डॉ.दिप्ती ठाकरे, सीईओ समीर ठाकरे, नगरसेवक ड.राजेश कातोरे, नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, काकासाहेब म्हस्के होमिओपॅथी मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ.विवेक रेगे, काकासाहेब म्हस्के फार्मसी कॉलेजचे प्राचार्य संदीप बडधे, पार्वतीबाई म्हस्के नर्सिंग इन्स्टिटयूटचे प्राचार्य अजित चवरदार, उद्योजक प्रविण म्हस्के आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ.सुभाष म्हस्के म्हणाले, आ. जगताप यांची नाळ जनसामान्यांशी जुळलेली असून शहर विकासात दुरदृष्टी दाखवत सर्वांना सोबत घेत सचोटीने ते काम करत आहेत. डॉ.अभितेज म्हस्के म्हणाले की, विश्वास आणि विकासाचा चेहरा म्हणून आ.जगताप यांचा नावलौकिक असून हे कौतुकास्पद असल्याचे ते म्हणाले.

# कर्करोग आजाराच्या जन जागृतीसाठी विद्यार्थ्यांचा संकल्प

**समाचार/नगर-दि.६**

जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून बूथ हॉस्पिटल आणि सीएसआरडी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. बूथ हॉस्पिटलचे प्रशासक मेजर देवदान कळकुंबे व सीएसआरडी महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुरेश पठारे यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना कर्करोग आजाराविषयी सखोल मार्गदर्शन मिळण्यासाठी सदर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना कर्करोग च्या प्रतिबंधात्मक उपाययोजना, योग्य आहार, तसेच उपचार पद्धती याबाबत जागरूक करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या वेळी कर्करोग तज्ज्ञ डॉ. तेजश्री जुनागडे आणि आहार तज्ज्ञ शीतल शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कळकुंबे यांनी कर्करोग प्रतिबंध आणि उपचारामध्ये जनजागृतीचे महत्त्व विशद केले. त्यांनी या गंभीर आजाराच्या विरोधात लढण्यासाठी समाजातील प्रत्येकाने पुढाकार




घेण्याचे आवाहन केले. या व्याख्यानात कर्करोग ची प्रारंभिक लक्षणे, कारणे, प्रतिबंधक उपाय, उपचार पद्धती आणि योग्य आहाराचे महत्त्व यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. डॉ. तेजश्री जुनागडे यांनी कर्करोग चे विविध प्रकार, त्यांच्या उपचारपद्धती तसेच वेळेवर निदानाचे महत्त्व सांगितले. आहार तज्ज्ञ शीतल शिंदे यांनी आरोग्यदायी जीवनशैली आणि पोषणयुक्त आहार कसा कर्करोग प्रतिबंधास मदत करू शकतो, याबाबत मार्गदर्शन केले. बूथ हॉस्पिटलच्या एचआर प्रमुख ज्योती कळकुंबे यांनी सूत्रसंचालन केले. तसेच, प्रवीण साबळे, सुनीता पारखे, अमोल देशमुख, पीयूष मकासरे, कुणाल कळकुंबे, सचिन शिंदे आणि अमित पठारे यांनी परिश्रम घेतले.

### महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना निवेदन

# कामरगाव परिसरातील वीजपुरवठा सुरळीत न केल्यास आंदोलन

**समाचार/नगर-दि.६**

शेतीच्या विजेचे वेळापत्रक बदलून मिळवे. पुर्ण दाबाने नियमित विद्युत पुरवठा मिळावा, या मागणीचे निवेदन कामरगाव परिसरातील शेतकऱ्यांनी वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिले. कामरगाव, भोरवाडी, पिंपळगाव कौडासह पंचक्रोशीतील गावामध्ये विजेचे नियमित वेळापत्रक नाही. भारनियमन कसलाही विचार न करता सुरु आहे. दिवसा वीज असताना फक्त ४ तास वीज मिळत आहे. त्यात सुद्धा वीज कधी येते व कधी जाते, सध्या रब्बी हंगाम सुरु असून पिकांना पाणी देणे खूप गरजेचे आहे. पाणी न मिळाल्यामुळे पिके जळून चालली आहेत. दिवसा वीज फक्त ४ तास असल्याने पीकांना पाणी देण्यास अडचणी येत आहेत. रात्री देखील शेतकऱ्यांना भरणे करताना थंडीचा त्रास होत आहे. गेल्या ४ दिवसापूर्वी कामरगाव परिसरात बिबट्याच्या वावर आढळून आल्याने शेतकरी भयभीत झाले आहेत. रात्री



> **कामरगाव, पिंपळगाव कौडा, भोरवाडी आणि पंचक्रोशीतील शेतकऱ्यांसाठी फक्त चार तास वीज मिळत आहे. त्यात वीज कधी जाते आणि कधी येते. विशेष म्हणजे रात्रीचा पिकांना पाणी देण्यासाठी गेले असता, बिबट्याचे दर्शन होते. त्यामुळे शेतकरी वर्ग भयभीत झालेला आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून शेतकऱ्यांना पूर्ण क्षमतेने वीज पुरवठा करावा. अन्यथा आंदोलन करावे लागेल.**
>
> **-गणेश साठे (माजी सरपंच, कामरगाव)**

पिकांना पाणी देताना त्यांना जीव मुठीत धरून काम करावे लागत आहे.

या सर्व बाबींचा सहानुभूती पूर्वक विचार करून यात तत्काळ सुधारणा करावी. दिवसा वीज देताना पूर्ण क्षमतेने वीज पुरवठा करावा. या मागणीचे निवेदन कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण यांना देण्यात आले. या प्रसंगी माजी सरपंच गणेश साठे, रावसाहेब ठोकळ, विजय साठे, शंकर कातोरे,योगेश आधळे,भाऊसाहेब ठोकळ, पोपट जाधव,हाबु शिंदे, राजू पठाण उपस्थित होते. कामरगाव आणि परिसरातील गावांसाठी असणाऱ्या या फिडरवरील ट्रान्सफॉर्मरची क्षमता ३ एमव्हीए असून ५ एमव्हीए करण्यात येणार आहे. त्यामुळे येथील शेतकऱ्यांचा विजेचा प्रश्न लवकरात लवकर सुटणार आहे, असे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण यांनी म्हटले आहे.

### अश्विनी जाधव यांच्या स्वखर्चातून बोअरवेल

# मिसगर चाळमधील महिलांची भटकंती थांबणार

**समाचार/नगर-दि.६**

लालटाकी, मिसगर चाळ येथील महिलांचा पाणी प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी माजी नगरसेविका अश्विनी जाधव यांनी स्वखर्चाने परिसरातील नागरिकांसाठी तीन बोअरवेल उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. या कामाचा शुभारंभ अश्विनी जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी फरजाना शेख, तब्बसुम शेख, रईसा शेख,शेरा बाजी, सोनु शेख, मुन्नी शेख, सीमा बाजी, शबनाज शेख, आयेशा खान, आलमआरा पठाण, मुमताज शेख आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



अश्विनी जाधव म्हणाल्या की, प्रभाग क्रमांक १० मधील विविध नागरी प्रश्न सोडविण्याचे काम करण्यात आले आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त करुन प्रभागातील विकास कामे मार्गी लावण्यात आली. कामाचे नियोजन करुन प्रभागातील सर्व मुलभूत प्रश्नांना प्राधान्य देण्यात आले आहे. मिसगर चाळ येथील पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असताना व तांत्रिक अडचणीमुळे पाणी प्रश्न सुटत नसल्याने येथील महिलांच्या डोक्यावरील हंडे कमी करण्यासाठी स्वखर्चाने बोअरवेल उपलब्ध करुन दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले.मिसगर चाळ येथील पाण्याचा प्रश्न गंभीर असताना महिलांना उन्हाळ्यात लांबवरुन डोक्यावर हंडे घेऊन पाणी आणावे लागत होते. महिलांची पाण्यासाठी असलेली भटकंती अश्विनी जाधव यांच्यामुळे थांबणार असल्याचे व्यक्त करुन उपस्थित महिलांनी त्यांचे आभार मानले.



# चार गाळे सील; चार नळकनेक्शन तोडले

**समाचार/नगर-दि.६**

महापालिका हद्दीमधील नागरिकांनी आपला चालू व थकीत कर तातडीने भरून घ्यावा व जप्ती पथकाची कारवाई टाळावी आयुक्त यशवंत डांगे यांच्या आदेशाने शहरातील थकीत कर वसुलीसाठी जप्तीची कारवाई करत असून बालिकाश्रम रोडवरील फकीर मोहम्मद नूर मोहम्मद बागवान व इतर यांच्या मालकीचे चार गाळे सील केले असून ४ नळ कनेक्शन तोडले आहे, सुमारे तीन लाख ३५ हजार ३५० रु. कर भरण्याचे आदेश यावेळी दिले आहे आयुक्त डांगे यांनी करावर लावलेली शास्ती १००% माफ केली असून १५ तारखेच्या आत सर्व करदात्यांनी आपला कर भरून महापालिकेला सहकार्य करावे असे आवाहन सावेडी प्रभाग अधिकारी बबन काळे यांनी केले

महापालिका प्रभाग कार्यालय जप्ती पथकाकडून चार गाळे सील व चार नळ कनेक्शन तोडण्याची कारवाई चावडी प्रभाग अधिकारी बबन काळे यांनी केली यावेळी कर निरीक्षक ऋषिकेश लखपती, नंदा भिंगारदिवे, अजय कांबळे, संजय तारडे, संदीप कोलते, किशोर जाधव, सागर जाधव, मंजाबापू लहारे, किशोर देठे, गोरख ठुबे, राजेश आनंद, रफिक देशमुख आदी उपस्थित होते.

### आठवणींना उजाळा, नव्या उपक्रमांची आखणी

# सवंगडी ७१ च्या मित्रांचा ५३ वर्षांनी आनंद मेळावा

**समाचार/नगर-दि.६**

दादा चौधरी विद्यालयाच्या १९७१ साली एस. एस. सी. उत्तीर्ण विद्यार्थांचा सवंगडी ७१ मेळावा तब्बल ५३ वर्षांनी संपन्न झाला. या मेळाव्यामध्ये पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर व नगर येथील सवंगडी सहभागी झाले होते. उपस्थितांमधून भाग्यवान सोडत पध्दतीने मेळावा अध्यक्ष व उदघाटकाची निवड करण्यात आली. यामध्ये वर्षा परदेशी व रमेश लुंकड यांची अनुक्रमे उदघाटक व अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. त्यांचा सौ जयश्री बागडे व डॉ. अंबादास ससे यांनी सत्कार केला. परदेशी व लुंकड यांनी यावेळी मार्गदर्शन केले.



ग्राहक संरक्षण कायदा, ग्राहक पंचायतीचे कामकाज, नगर शाखेचे योगदान याबद्दल माहिती देण्यासाठी ग्राहक पंचायत, नगर शाखेचे जिल्हा सचिव ड.सिद्धार्थ वाघमारे व सह सचिव संजय जोशी यांना निमंत्रित केले होते त्यांनी ग्राहक संरक्षण कायद्याची व्याप्ती,अंमलबजावणी, जागरुक ग्राहकांचे हक्क-कर्तव्ये या विषयावर मार्गदर्शन केले.

दुपारच्या सत्रात कृष्णा बागडे, रमेश निलाखे, बुटाणी यांनी कथा वाचन, डॉ. रमेश रोहिवाल यांनी गीत व रमेश वैद्य यांनी कविता सादर केली. उलट सुलट अंक म्हणणे, एबीसीडी म्हणणे शहरातील नामवंत व्यक्ती कलावंत यांचे वर्णन करणे, ऐतिहासिक घटनांचे वर्णन करणे, यावरील कोडी सोडवणे इत्यादी खेळ घेऊन बागडे यांनी कार्यक्रमाची रंगत वाढविली. डॉ. रोहिवाल यांची नॅशनल इक्विलिब्रीओ मेरीट सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेच्या अध्यक्षपदी सन २०२६ साठी निवड झाली त्याबद्दल सर्व सवंगड्यांच्या वतीने त्यांचा अनिल वाबळे यांनी सन्मान केला. ॲड. दत्तात्रय उदावंत यांनी कायदे विषयक अडचणीबाबत मार्गदर्शन केले.

आपल्या गत काळातील अनंत स्मृती जागृत करून पुढील वाटचालीसाठी उर्जा मिळवून आपल्या सवंगड्यांना ही उर्जा देत आनंद लुटला. सर्व मित्रमंडळी आता वयोवृद्ध आहोत आपण आपलं हे बोनस आयुष्य परमेश्वराची व समाजसेवेसाठी द्यावे असे आवाहन केले.

छातीविकार व ॲलर्जी शिबिरात ५४ रुग्णांची तपासणी

# आनंदऋषी हॉस्पिटलची आरोग्यसेवा कौतुकास्पद : कटारिया



समाचार/नगर-दि.०५

आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये प्रत्येक महिन्याला दोन शिबिरे घेऊन असाध्य आजारांवरील उपचारांसाठी मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.येथे रुग्णांची सेवा मोठ्या प्रमाणात केली जात आहे. आनंदऋषी हॉस्पिटलच्या सेवा कार्यात जैन सोशल फेडरेशनचे सर्व सदस्य,डॉक्टर्स,नर्सेस तसेच सर्व स्टाफ तन-मन-धनाने आरोग्य सेवा देण्याचे कार्य करीत आहे.आरोग्य शिबिराच्या माध्यमातून होणारी रुग्णसेवा कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन उद्योजक धरमचंद कटारिया यांनी केले आहे.

आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये छातीविकार व ॲलर्जी साठी मोफत तपासणी शिबिराचे उद्घाटन उद्योजक धरमचंद कटारिया व पुष्पा कटारिया व परीवार यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी सचिन कटारिया, सारिका कटारिया,अशोक सोनीमंडलेचा,अनुजाताई सोनीमंडलेचा आदींसह जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, डॉ.प्रकाश कांकरिया, बाबुशेठ लोढा, प्रकाश छल्लाणी, डॉ.आशिष भंडारी, सुभाष मुनोत, फुफ्फुस विकार तज्ञ डॉ.स्नेहा तिरपुडे आदी उपस्थित होते.

सारिका कटारिया म्हणाल्या, आरोग्यसेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे.जैन सोशल फेडरेशनने रुग्णासेवेची संधी देऊन कटारिया परिवाराला खारीचा वाटा उचलण्याची संधी दिली आहे.आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये शिबिराच्या माध्यमातून होणारी रुग्णसेवा ही समाजातल्या गरजू रुग्णांपर्यंत पोहोचली आहे.

संतोष बोथरा म्हणाले,आचार्य आनंदऋषीजींचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आनंदऋषी हॉस्पिटलमध्ये अखंड आरोग्य सेवेचा यज्ञ अनेक वर्षापासून सुरू आहे.सचिन कटारिया यांनी प्राधान्याने आनंदऋषी हॉस्पिटलच्या प्रशासकीय कार्यात मदत केली आहे.तसेच वर्धमान महावीर युनिव्हर्सिटी या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला सचिन कटारिया यांच्या अथक परिश्रमातून २४ एकर चा प्लॉट उपलब्ध झाला आहे.तसेच कटारिया परिवार हा पूर्वीपासूनच आनंदऋषी हॉस्पिटलच्या सेवा कार्यात जोडला गेलेला आहे.जिथे कमी तिथे आम्ही याप्रमाणे कटारिया परिवार सातत्याने सामाजिक कार्यात योगदान देत आहे. या आरोग्य शिबिरात ५४ रुग्णांनी लाभ घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले.तर आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले.

# नॉव्हेल ॲबॅकस ॲकॅडमीचे ४० विद्यार्थी देशपातळीवर चमकले



समाचार/नगर-दि.०६

नॉव्हेल ॲबॅकस ॲकॅडमीच्या देशपातळीवरील ॲबॅकस स्पर्धेमध्ये २६७ मुलांनी घवघवीत शय संपादन करुन नगरच्या नावलौकिकात भर घातली आहे. ८० मुलांना प्रथम, ७८ मुलांना द्वितीय क्रमांक तर ३२ मुलांना तृतीय क्रमांकाची बक्षिसे मिळाली आहे. तसेच ४० मुलांना चॅम्पियन, २ मुलांना चॅम्पियन ऑफ चॅम्पियन आणि ३५ मुलांना विनर अशी बक्षिसे मिळाली आहेत.

सोहम रायकर या मुलाने अख्ख्या लेव्हलमध्ये चॅम्पियन मिळवले आहे. तसेच झेनाब आंबेकर व शौर्य देशमुख यांना चॅम्पियन ऑफ चॅम्पियन हे पारितोषिक मिळाले. पारितोषिक पात्र विद्यार्थ्यांचे नॉव्हेल ॲबॅकस संचालिका ज्योती जांभळे यांनी अभिनदन केले.

आधुनिक युगात मुलांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये ॲबॅकसचे महत्व वाढले आहे. ॲबॅकस मुळे मुलांचे अंकगणित सुधारते, एकाग्रतेमध्ये वाढ होते व अभ्यासात मुले हुशार होतात असे जांभळे यांनी सांगितले.

# आर्किटेक्चर अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षेची नोंदणी सुरु

समाचार/नगर-दि.०६

कौन्सिल ऑफ आर्किटेक्टचर नवी दिल्लीच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षेची नाव नोंदणी सुरु झाल्याची माहिती रमेश फिरोदिया कॉलेज ऑफ आर्किटेक्टचर,वाळूंज चे विश्वस्त सी.ए. रमेश फिरोदिया यांनी दिली आहे.

यामध्ये पुढील काही गोष्टी प्रामुख्याने लक्षात घ्याव्यात. नाटा २०२४ प्रवेश परीक्षेत जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले ते यावर्षी प्रवेशास पात्र असतील. नाटाची परीक्षा विद्यार्थी ३ वेळा देऊ शकतात. नाटा २०२४ परीक्षेत पात्र विद्यार्थ्यासाठी काही बदल केलेले आहेत. प्रवेश परीक्षा मार्च २०२५ ते जून २०२५ या कालावधीत महिन्याच्या प्रत्येक शुक्रवारी व शनिवारी घेतली जाईल. विद्यार्थी बारावी भौतिकशास्त्र, गणित या विषयासह उत्तीर्ण झालेला असावा किंवा डिप्लोमा गणित विषयासह उत्तीर्ण झालेला असावा. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी रमेश फिरोदिया कॉलेज ऑफ आर्किटेक्टचर, वाळूंज यांच्यावतीने मार्गदर्शन वर्ग घेतले जाणार आहेत. तरी इच्छुकांनी प्रा. मनोज कापरे (९५१८३३८२०२) व भूषण घुगरकर (८६०५०५३०२५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेचे सल्लागार विश्वस्त डॉ. शरद कोलते यांनी केले आहे.

# ऊर्जा गुरुकुल शाळेमध्ये ३ दिवस बालसाहित्य महोत्सव

समाचार/नगर-दि.०६

ऊर्जा गुरुकुल स्कूल (केडगाव) आणि फंकी रेनबो या बंगळरु स्थित संस्था यांच्या सहकार्याने दि ६ आणि ७ फेब्रुवारीला सकाळी ९:३० ते सायंकाळी ६ पर्यंत आणि ८ फेब्रुवारी (शनिवार) रोजी सकाळी ९:३० ते दुपारी २ पर्यंत बालसाहित्य महोत्सवाचे आयोजन केले जात आहे.

यात ऊर्जा गुरुकुल स्कूल मधील मुलांना पुस्तकांच्या लेखकांना भेटण्याची व या सत्रादरम्यान त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे.

मुलांसाठी वेगवेगळ्या प्रकारची पुस्तके (विक्रीसाठी) उपलब्ध करून दिली जाणार आहेत. पुस्तकांचे विविध प्रकार जसे की, पिक्चर बुक्स, अक्टिविटी बुक्स, कॉमिक्स आणि ग्राफीक नॉवेल्स, मिडल रीडर्स, बुक्स फॉर द यंग अडल्ट, चॅप्टर बुक्स त्याचप्रमाणे इंग्रजी व हिंदी भाषांमधील अधिक पुस्तके या साहित्य महोत्सवा दरम्यान बघायला मिळणार आहेत. आपल्या मुलांस त्यांच्या (वयानुसार) पुस्तकाच्या स्वरूपित प्रती मिळविण्याचा अविस्मरणीय अनुभव देता येणार आहे. उत्सव सत्र आयोजित करणारे लेखक हे आहेत. नियती शर्मा, नंदिनी नायर, पियूष सेखसरीया, विद्या मनी (संस्था- फंकी रेनबो)

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या स्पर्धांचे बक्षीस वितरण



समाचार/नगर-दि.०६

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या (संगमनेर) वतीने जिल्ह्यातील सर्व अध्यापक विद्यालयासाठी (डी.एल.एड.) जिल्हांतर्गत क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ पारनेर क्रीडा संकुल येथे संपन्न झाला. या कार्याक्रमाच्या अध्यक्ष स्थानी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेश बनकर हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून तालुका क्रिडा अधिकारी व डाएट चे जेष्ठ अधिव्याख्याता लक्ष्मण सुपे तसेच अधिव्यख्यता मुकुंद दहिफळे, सांख्यिकी सहाय्यक नितीन टिळेकर आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन जामगाव अध्यापक विद्यालायाचे प्राचार्य गोडे जी.के.व सूत्रसंचालन अध्यापकचार्य जाधव यांनी केले, तर प्रास्ताविक प्राचार्य शेटे यांनी केले. अतिथींचा परिचय अध्यापकचार्य काळे सर यांनी करुन दिला. बनकर म्हणाले की, कला व क्रीडा या दोन्ही बाजू माणसाला नव चैतन्य देत असतात. भावी शिक्षक हा शरीराने व मनाने सक्षम असला पाहिजे. प्रत्येकाने आपल्या अंगी एखादी तरी कला जोपासली पाहिजे.यावेळी आपल्या उत्कृष्ट नियोजनासाठी यशवंतराव गाड़े पाटील विद्यालयाचे प्राचार्य उत्तम राजळे यांचा सन्मान प्राचार्य डॉ. राजेश बनकर यांना केला.

अहमदनगर जिल्हांतर्गत अध्यापक विद्यालय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेमध्ये अ.ए. सोसायटीच्या अध्यापक विद्यालयातील छात्राध्यापकांनी घवघवीत यश संपादन केले. यामध्ये सांघिक व सांस्कृतिक प्रकारात विविध बक्षीसे पटकावली. सर्व जिल्हयातील अध्यापक विद्यालयांमध्ये अ.ए. सोसायटी अध्यापक विद्यालयाने सर्व स्पर्धामध्ये चकमदार कामगिरी केल्यामुळे अध्यापक विद्यालयाच्या मुलींनी जनरल चॅम्पियनशीप फिरता करंडक मिळविला. यासाठी प्रेरणा प्राचार्य संदीप उबाळे यांनी दिली. तर क्रीडा अध्यापक मंगेश उपासनी यांनी मुलांचा सराव करुन घेतला. तसेच आबासाहेब काकडे विद्यालय, शेवगाव या अध्यापक विद्यालयास मुलांचा फिरता करंडक मिळाला.

अ.ए. सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, शाला समिती चेअरमन प्रकाश गांधी, संस्था विश्वस्त व शाला समिती सदस्य ॲड. गौरव मिरीकर व संस्था सल्लागार मंडळ सदस्य व शाला समिती सदस्य भूषण भंडारी या सर्वांनी मुलांचे अभिनंदन केले. स्पर्धा यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी म.मा. शिंदे अध्यापक विद्यालय, लोनेश्वर अध्या. विद्यालय, संजीवनी प्रतिष्ठान अध्यापक विद्यालय व संपदा अध्यापक विद्यालय यांनी कामकाज पाहिले.


चाहिए
साऊथ इंडियन हॉटेल के लिए एक शेफ/बावर्ची और दो वेटर चाहिए।
अच्छी वेतन / सॅलरी।
संपर्क करे-
मो. नं. 8605307917

पाहिजेत
हेल्पर (जेन्टस्) २
१० वी वयमर्यादा १८वर्षा पुढील
आकर्षक पगार
संपर्क :-
9890027068

भाड्याने देणे आहे
गुलमोहररोड, ओम स्वीटस्जवळ २२० चौ.फुटांचे दुकान भाड्याने देणे आहे.
गुलमोहररोड, ओम स्वीटस्जवळ २५० चौ.फुटांचे फर्निचर, एसी, केबिन्ससह असलेले तयार ऑफिस भाड्याने देणे आहे. कन्सल्टींग ऑफिस, पतसंस्था, सीए, ॲडव्होकेट, डॉक्टर यांच्यासाठी उपयुक्त.
फोन करण्याची वेळ : सकाळी १० ते संध्या. ६ वाजेपर्यंत
8805988408, 8805988403

UNITED PHARMA
Pharmaceutical Distributors
Near Kedgaon Ves, Kedgaon
9049934444

२ घर विकणे आहेत
भावनाऋषी सोसा., कल्याणरोड येथील सर्व सोयींयुक्त १ रुम किचनची दोन घरे त्वरित विकणे आहे.
-: संपर्क :-
9850791142

दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी
नवीपेठ, अहमदनगर
बीओटी तत्वावर शालेय बस त्वरित पाहिजे
दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमिक व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांची ने-आण करण्याकरिता बीओटी तत्वावर २० सीटस्ची बस त्वरित पाहिजे.
तरी दिनांक १५/०२/२०२५ अखेर कार्यालयीन वेळेत ड्रायव्हरसह भाडे तत्वावर वार्षिक किती रक्कम लागेल त्यासह बंद लिफाफ्यामध्ये संस्थेच्या कार्यालयात अर्ज करावेत.
अध्यक्ष / सेक्रेटरी
मो.नं. ९४२०६३९७६१


॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥



कळविण्यात अत्यंत दु:ख होत आहे की, आमचे वडील
कै. दामोदर रामचंद्र बोरुडे
यांना बुधवार २९/१/२०२५ रोजी दु:खद निधन झाले तरी त्यांचा
✲ दशक्रिया विधी ✲
शुक्रवार दि. ७/२/२०२५ रोजी सकाळी ९ वा.
रामेश्वर मंदीर (जुने कायगांव), प्रवरासंगम येथे होणार आहे.
✲ दु:खांकित ✲
श्रीमती सुमन दामोदर बोरुडे (पत्नी)
श्री. नंदकुमार दामोदर बोरुडे (मुलगा) सौ. आशा विकास खानजोडे (मुलगी)
श्री. गणेश दामोदर बोरुडे (मुलगा) श्री. विकास काशिनाथ खानजोडे (जावई)
श्री. दिनेश दामोदर बोरुडे (मुलगा) सौ. शालन शंकर खरे (मुलगी)
श्री. मुकुंद दामोदर बोरुडे (मुलगा) श्री. शंकर प्रभाकर खरे (जावई)
बोरुडे, वाघमारे, खानजोडे, खरे, यशवंत, जाधव, धुळेकर, पगार


CHANGE IN NAME
I, KOMAL DHANANJAY DOIPHODE, wife of MIHIR MILIND KULKARNI, residing at ASHRAY, BAGDE MALA, BALIKASHRAM ROAD, AHMEDNAGAR, have changed my name after marriage and shall henceforth be known as KOMAL MIHIR KULKARNI.
All concerned may take note.


शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकाची रांगोळी
M डागा
शांतीलाल डागा
दाळमंडई/मार्केट यार्ड, अहमदनगर.
फोन नं. ७५८८११५१५७, ९८२२०८१४४०

घरच्यासारखी वृद्ध/रुग्णसेवा

वृद्धत्व-कॅन्सर-अपघात, शस्त्रक्रिया, स्मृतीभ्रंश इ. रुग्णांना घरच्यासारखी निवासी सेवा - शुश्रूषा. (सशुल्क)
9011020176, 9011026483, 7499980845
स्नेहदीप केंद्र
केडगाव, अहमदनगर

SASE DCORATERS

Mandap, Light & Flower Decoraters
Add. Katvan Khandoba Road, Ahmednagar
9822331006, 9579544110

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात
दि.०६/०२/२०२५ ते दि.१२/०२/२०२५

स ला ते स ला ना ते (मराठी)
05.15 PM
एक राधा एक मीरा (मराठी)
12.00 PM
BADASS RAVIKUMAR (हिंदी)
09.15 AM 12.00 PM
02.30 PM 08.00PM 10.45 PM
LOVEYAPA (हिंदी)
08.30 AM 11.25 AM
02.15 PM 07.50PM 10.20 PM
सनम तेरी कसम (हिंदी)
11.15 AM 05.00 PM 10.20 PM
फसक्लास दाभाडे (मराठी)
02.00 PM
SKY FORCE (हिंदी)
08.00 PM
DEVA (हिंदी)
08.30 AM 04.55 AM
for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse
AVAILABLE ON book my show
CONNPLEX
AVAILABLE ON book my show
3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

आपल्या उज्वल भविष्यासाठी आजच गुंतवणूक करा
व्ही गार्डचा सोलार वॉटर हिटर घेऊन या..
वीज बिलात बचत करून आपले भविष्य सुरक्षित करा...

Evacuated Tube Collector
V-GUARD Solar Water Heater MNES Approved
SS 304 L टँक
उत्तम दर्जाचे PUF इन्शुलेशन
60 LS 5000 LPD उपलब्ध प्रेशराइज्ड मॉडेल्स उपलब्ध
देशात सर्वाधिक विक्री होणारे व्ही गार्ड सोलार वॉटर हिटर
V-GUARD® Solar Water Heater
- अधिकृत विक्रेते -
प्रोप्रा. मिलिंद गंधे
आदित्य एन्टरप्रायजेस्
गुलमोहोर रोड, सावेडी, अ. नगर. 9325103781
(*अटी लागू)